महाराष्ट्र विधानसभा

पहिले अधिवेशन, २०२५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

शुक्रवार, दिनांक २१ मार्च, २०२५ / फाल्गुन ३०, १९४६ (शके)

(१) उप मुख्यमंत्री **(२) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** **(३) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री** **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**	**यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ५३

मुंबईतील मुलुंड टोलनाक्यावर महानगरपालिकेची परवानगी न घेता होर्डींग लावण्यात आल्याबाबत

(१) * ५ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरामध्ये होर्डींग लावण्यासाठी महानगरपालिकेची परवानगी बंधनकारक असतांना मुलुंड टोलनाक्यावर विनापरवाना होर्डींग लावण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी तीन वर्षासाठी सिबा एजन्सीला दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी सदर होर्डींग लावण्यासाठी कार्यादेश (वर्क ऑर्डर) दिले असून दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ ते दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत परवानगी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर होर्डींगवर महानगरपालिका प्रशासनाव्दारे आतापर्यंत ६८ वेळा दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय ,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित एजन्सी तसेच अधिकारी कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मुलुंड टोलनाक्यावरील दोन्ही जाहिरात फलक महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने निविदा प्रक्रिया राबवून उभारले आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने उभारलेल्या जाहिरात फलकाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुज्ञापन खाते "टी" विभाग यांनी तपासणी केली असून याकरिता अधिनियमातील कलम ३२८ नुसार मान्यता घेण्यात आली नाही असे आढळून आले.

या जाहिरात फलकावरील प्रदर्शित जाहीरातीचे निष्कासन करून मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ चे कलम ३२८ नुसार जाहिरात धारकावर न्यायालयीन दावे दाखल करण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

वारजे माळवाडी (जि.पुणे) येथे पथ विभागामार्फत करण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

(२) * ८१५ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या वारजे माळवाडी भागातील पथ विभागामार्फत करण्यात आलेली कामे अपूर्ण व निकृष्ट दर्जाची करुन त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकूण कामांपैकी केवळ २० ते ३० टक्के कामे पूर्ण करुन बनावट कागदपत्रांच्या आधारे कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने प्राप्त निधीचा अपहार करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू बाब निदर्शनास येऊनही संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपूर्ण कामे पूर्ण करणे, अपहारीत निधीची वसुली करणे, भविष्यात अशा प्रकारांची पुनरावृत्ती टाळण्याबाबत कोणती उपाययोजना केली तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटची सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(३) * ३०६९ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटची सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत पालिकेच्या ९१ अभियंत्यांना पालिकेकडून कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चार कंत्राटदारांना आणि गुणवत्ता व्यवस्थापन एजन्सी यांना एकूण ३.४ कोटी असा दंड ठोठावला असून आकारण्यात आलेला दंड हा प्रकल्पाच्या प्रमाणात अत्यंत नगण्य असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सुरू असलेल्या रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणाच्या कामांमध्ये तडे आढळल्याने पर्यवेक्षन करणाऱ्या ९१ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस देवून ताकीद देण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

४ कंत्राटदारांना देण्यात आलेल्या कंत्राटाची एकूण किंमत रू.६६३२ कोटी इतकी आहे. कंत्राटातील अटीं व शर्तीनुसार दोषयुक्त कामावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. दोषयुक्त कामाचे प्रमाण एकूण झालेल्या कामाच्या ०.४ टक्के इतके आढळून आलेले असून त्याप्रमाणात कंत्राटदारावर दंड आकारण्यात आला आहे.

(३) निविदेतील अटी व शर्ती नुसार दोषयुक्त काम तोडून टाकून नव्याने करणे व कामाच्या किंमती इतका दंड आकारण्याची तरतूद आहे. या प्रकरणी कंत्राटदार व गुणवत्ता व्यवस्थापन संस्थेस दोषयुक्त कामाच्या दुप्पट म्हणजे प्रत्येकी रू.३.३७ कोटी इतका दंड आकारण्यात आला आहे. तसेच दोषयुक्त काम कंत्राटदाराकडून स्वखर्चाने नव्याने करून घेण्यात येत आहे. पर्यवेक्षन करणाऱ्या ९१ अभियंत्यांना कारणे दाखवा नोटीस देवून त्यांचा खुलासा घेण्यात आला आहे. पर्यवेक्षणात काही त्रुटी आढळल्याने त्यांना समज देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे शिवाजीनगर (जि.ठाणे) येथील जमिन विकास हक्क हस्तांतरणामध्ये झालेला गैरव्यवहार

(४) * ९५७ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील मौजे शिवाजीनगर (जि.ठाणे) क्षेत्रावरील विकास हक्क हस्तांतरणामध्ये (टीडीआर) ५० कोटीचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संदर्भातील चौकशी अहवाल शासनास सादर होवूनही त्यावर अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) अशा आशयाची मा.उप लोकआयुक्त यांचेकडे तक्रार व मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका दाखल करण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कल्याण हद्दीतील मौजे गांवदेवी सर्व्हे नं. ३५०/अ (जुना) ३२ (नवीन) ही जमिन विकास योजनेतील आरक्षणाने बाधीत असल्याने, अर्जदार/जमिन मालक यांनी सादर केलेल्या प्रस्तावातील मालकी हक्काच्या कागदपत्रांनुसार तपासणी करून १८,५२५.३० चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी ८८१८.७० चौ.मी. क्षेत्राचे हस्तांतरणीय विकास हक्क अनुज्ञेय करण्यात आलेले आहे.
• त्यावरून, मौजे गांवदेवी, ता. कल्याण येथील सर्व्हे नं. ३२ (जुना सर्व्हे नं.३६६/अ) येथील जमिन ही शासकीय जमिन असून, त्या लगत असणारा सर्व्हे नं.३१ (जुना ३५०/अ) हा खाजगी मालकीचा आहे. तथापि, उक्त दोन्ही सर्व्हे नंबरच्या अधिकार अभिलेखात खाडाखोड करून, बेकायदशीररित्या जमिनी आपल्या नावावर करून टीडीआर घेतल्याबाबत मा.उप लोकआयुक्त कार्यालय तसेच, मा. उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली.
• मा. उप लोकआयुक्त यांनी निर्देशित केल्यानुसार जिल्हाधिकारी, ठाणे यांचेमार्फत सदर प्रकरणाची चौकशी केली असता, उक्त जमिनीच्या फेरफारांमध्ये खाडाखोड करून सरकारी जमिन खाजगी दर्शविल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदरचे सर्व्हे नंबरचे ७/१२ दुरूस्त करून, अधिकार अभिलेखात नोंद घेण्यात आली.
• अधिकार अभिलेखात केलेल्या खाडाखोडीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, ठाणे कार्यालयामार्फत तत्कालीन तलाठ्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला असून, विष्णुनगर पोलीस स्टेशन, डोंबिवली यांचेमार्फत पुढील तपास सुरू आहे.
• तसेच, महानगरपालिकेमार्फत संबंधित तत्कालीन नगररचनाकार व कनिष्ठ अभियंता यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली असून, सदर प्रकरणी दाखल याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून संबंधितांवर कारवाईची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

बिलोली (जि. नांदेड) तालुक्यातील रस्त्याचे व पुलाचे काम अपूर्ण असल्याबाबत

(५) * २०९० श्री.जितेश अंतापुरकर (देगलूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिलोली (जि. नांदेड) तालुक्यातील हुनगुंदा, माचनूर, गंजगाव, येसगी, एम.डी.आर. ४१ या रस्त्याचे व पुलाच्या कामास सन २०२२ मध्ये प्रशासकीय मान्यता दिली असताना गजानन कंन्स्ट्रक्शन कंपनी, पुसद यांनी माहे मे, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान कामास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर काम पुर्ण करण्याचा कालावधी माहे जून, २०२४ असतानाही अद्यापपर्यंत फक्त ३५% काम पूर्ण झाले असून ती कामे देखील निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामांची देयके अदा करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंपनी व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे : (१) सदर रस्ता हा राज्यमार्ग दर्जाचा असून प्रश्नाधीन लांबी १८.५० किमी आहे. या लांबीत रक्कम रु.७३.९० कोटी चे मंजूर कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दि.०४/०५/२०२३ रोजी कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(२) सदरची कामे सद्यस्थितीत करारनाम्याच्या तरतूदी प्रमाणे प्रगतीत आहे.

(३) करारनाम्याच्या तरतूदी प्रमाणे पूर्ण केलेल्या कामाचे रक्कम रु.३.८९ कोटीची देयके अदा करण्यात आली आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील नागपाडा येथील सिध्दार्थ नगरमध्ये पाण्याची टाकी फुटून झालेली दुर्घटना

(६) * ६७६ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.हारुन खान (वर्सोवा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नागपाडा येथील सिध्दार्थ नगरमध्ये पाण्याची टाकी फुटून एका मुलीचा मृत्यु होऊन तीन कामगार जखमी झाले असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याची टाकी फुटण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे.

(२) मुंबईतील सिध्दार्थ नगर येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांसाठी सेवानिवास्थाने बांधण्यात येणाऱ्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात बांधण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीमध्ये टँकरद्वारे पाणी भरत असताना पाण्याचा दाब वाढल्याने पाण्याची टाकी फुटल्याची शक्यता आहे.

(३) या प्रकरणी मे. शायोना कॉरपोरेशन या संबंधीत कंत्राटदारास खबरदारीचे उपाय प्रभावीपणे राबवून अशा घटना भविष्यात टाळण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून ताकिद देण्यात आली आहे. तसेच या प्रकरणी स्थानिक नागपाडा पोलीस ठाणेमार्फत घटनास्थळाची पाहणी करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

मौजे मांडा (जि.ठाणे) येथील श्री विनायक आशिष को.ऑप.हौ.सोसा.
या इमारतीवर उभारण्यात आलेल्या मोबाईल टॉवरबाबत

(७) * ४९७० श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विविध इमारतींवर उभारण्यात येणाऱ्या अनधिकृत व बेकायदेशीर मोबाईल टॉवरमुळे रहिवाशांना नाहक त्रास होत असून इमारतीचे नुकसान देखील होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजे मांडा (जि.ठाणे) येथील श्री विनायक आशिष को.ऑप.हौ.सोसा. या इमारतीवरील बेकायदेशीर मोबाईल टॉवर्स काढून टाकण्याबाबत कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्तांनी दिनांक २६ जुलै,२०२३ रोजी वा त्यासुमारास आदेश दिल्याने संबंधित वॉर्ड ऑफिसरने विदयुत प्रवाह बंद करुन मोबाईल टॉवर्स बंद केला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मोबाईल टॉवर उभ्या करणाऱ्या मे. इंडस कंपनीने रहिवाशांचा विरोध झुगारुन व स्थानिक प्रशासनाशी संगनमत करुन दिनांक ११ ऑगस्ट,२०२३ रोजी सदरच्या टॉवर्सचे सील तोडून पुन्हा प्रक्षेपण सुरु केल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर मोबईल टॉवर्सच्या रेडिएशनचा त्रास नागरिकांना होत असून इमारतीचे नुकसान झाले असल्याने इमारतीमधील नागरिकांनी मोबाईल टॉवर्स लावण्यास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन इमारतीवर अनधिकृत उभारण्यात आलेले मोबाईल टॉवर्स काढून टाकण्याबाबत तसेच दोषी कंपनी व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) महानगरपालिकेच्या पहाणीमध्ये विविध ठिकाणी अनधिकृत मोबाईल टॉवर असल्याचे आढळून आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) मोबाईल टॉवर उभ्या करणाऱ्या इंडस कंपनीने रहिवाशांचा विरोध झुगारुन, सदर कंपनीने महानगरपालिकेद्वारे सिल केलेल्या टॉवरचे सिल तोडून विनापरवानगी प्रक्षेपण सुरू केले आहे. सदर बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास येताच महानगरपालिकेने सदर टॉवर अनधिकृत घोषित करून, टॉवर निष्कासित करणेबाबत कार्यवाही सुरू केलेली आहे.

(४) अशा आशयाची तक्रार स्थानिक रहिवाशांकडून महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली, हे खरे आहे.

(५) सदर गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या गच्चीवर तात्पुरत्या स्वरूपाचे सेल्युलर बेस स्टेशन उभारण्याकरिता मे.इंडस टॉवर यांना महानगरपालिकेमार्फत परवानगी देण्यात आली होती.

तथापि, सदर परवानगीची मुदत दि.०१.०६.२०२३ रोजी संपुष्टात आल्याने, सदर ठिकाणचे सेल्युलर बेस स्टेशन काढून टाकणेकरीता महानगरपालिकेने दि.२६.०७.२०२३ पासून कारवाई प्रस्तावित केली असून, प्रथमत: विद्युत प्रवाह बंद केला होता.

मोबाईल टॉवर उभ्या करणाऱ्या इंडस कंपनीने रहिवाशांचा विरोध झुगारुन, महानगरपालिकेद्वारे सिल केलेल्या टॉवरचे सिल तोडून विनापरवानगी प्रक्षेपण सुरू केले आहे. सदर बाब महानगरपालिकेच्या निदर्शनास येताच महानगरपालिकेने सदर टॉवर अनधिकृत घोषित करून, टॉवर निष्कासित करणेबाबत कार्यवाही सुरू केलेली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

साफसफाईसाठी रोबो असताना देखील ठाणे महानगरपालिकेकडून भाडयाच्या वाहनांवर अतिरिक्त खर्च होत असल्याबाबत

(८) * १८९ श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नालेसफाई अभावी मोठ्या प्रमाणात पूर परिस्थती निर्माण होण्याच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेने ६ कोटी ४५ लक्ष रूपये खर्च करून नालेसफाईसाठी रोबो खरेदी केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे रोबो अनेक दिवसांपासून वापराविना महानगरपालिकेच्या अग्निशमन केंद्रात धूळखात पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नालेसफाई करण्यासाठी रोबो असताना देखील भाडयाच्या वाहनांवर खर्च करण्यात येत असून यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार सुरू आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर रोबोचा वापर न करणे, रोबोच्या देखभाल दुरुस्तीसाठीचा खर्च तसेच नालेसफाईसाठी पर्यायी करण्यात येणारा खर्च इ. सर्व बाबींची शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) अंशत: खरे आहे.

ठाणे महानगरपालिकेने सन २०१७ मध्ये महापालिका क्षेत्रातील अत्याधुनिक पद्धतीने मलवाहिन्याची निगा व देखभाल करणे व नवीन मलवाहिन्या टाकणे,अनधिकृत बांधकाम निष्कासित करणे,नालेसफाई, शहरातील झाडांच्या फांद्या छाटणे तसेच वेगवेगळ्या आपत्कालीन परिस्थितीत आवश्यकतेप्रमाणे काम करण्यासाठी रोबोटिक मल्टीपर्पज एक्सावटर मशीन खरेदी केलेली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर रोबो मशीन सन २०१७ पासून ५ वर्षे कालावधीसाठी वापरण्यात आलेली आहे. सदर मशिनच्या पुढील कालावधीत परिचलन व निगा देखभालीसाठी अवलंबलेल्या निविदा प्रक्रियेस अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने मूळ उत्पादक असलेल्या कंपनीशी संपर्क साधून विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर मशीन बाळकुम येथील अग्निशमन केंद्र येथे उपलब्ध असलेल्या जागेमध्ये सुरक्षित ठेवण्यात आलेली आहे.

(३) हे खरे नाही.

नालेसफाईचे काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने निविदा प्रक्रिया राबवून नालेसफाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वृक्ष गणनेच्या कामाची चौकशी करण्याबाबत

(९) * २६०७ श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील वृक्षांचे सॅटेलाइटद्वारे (भौगोलिक सूचना प्रणाली) सर्वेक्षण करुन वृक्ष गणना दोन वर्षात पूर्ण करून पुढील तीन वर्ष देखभाल, संकेतस्थळ आणि भ्रमणध्वनी प्रणाली विकसित करण्याच्या अटी शर्तीवर माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान टेरेकॉन इकोटेक एजन्सी या संस्थेला वृक्ष गणनेचे काम देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर संस्थेने विहित मुदतीपेक्षा चार वर्षाचा कालावधी जास्त घेऊनही अद्यापही वृक्षांचे सॅटेलाइटद्वारा सर्वेक्षण करून स्वतंत्र संकेतस्थळ आणि भ्रमणध्वनी प्रणाली विकसित न केल्याने वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज ऑनलाइन सुरू होवू शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीला महानगरपालिकेच्यावतीने अंदाजे पावणे सात कोटी रुपयांचे देयके अदा करण्यात आल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वृक्ष प्राधिकरणाचे कामकाज ऑनलाइन पद्धतीने सुरू करण्याबाबत तसेच दोषी कंपनी व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.

एकूण रु.५,०७,३३,७५२/- एवढी रक्कम केलेल्या कामाबद्दल देण्यात आली असून प्रलंबित कामाकरिता अधिदान करणेत आलेले नाही.

(४) वृक्षगणना ऑनलाईन प्रणालीद्वारे संकेतस्थळावर उपलब्ध करुन वापरात आणणे व वृक्ष प्राधिकरण कामकाज ऑनलाईन करणे ही कामे अद्यापही प्रलंबित असल्यामुळे संबंधित संस्थेस जा.क्र.उद्यान/३अ/कावि/२८९४/२०२४, दि.२४/१२/२०२४ अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून संस्थेमार्फत त्याबाबत दि.२७/१२/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खुलासा करणेत आला आहे. खुलाशाची निविदेतील अटी शर्तींच्या अनुषंगाने पडताळणी करणेत येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्यात येणार आहे. वृक्ष प्राधिकरण कामकाज ऑनलाईन करणेबाबत पालिकेमार्फत माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या समन्वयाने नियोजन करणेत येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे नाळवंडी (ता.जि. बीड) येथे जिल्हा नियोजन समिती बीड अंतर्गत करण्यात आलेली कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

(१०) * १६०२ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे नाळवंडी (ता.जि.बीड) येथे सन २०२४ मध्ये जिल्हा नियोजन समिती, बीड अंतर्गत सुरु असलेली कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामांचा दर्जा, कामाची स्थळपाहणी करणे, गुणवत्ता तपासणी करणे याबाबत ग्रामस्थांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभाग, बीड तसेच जिल्हाधिकारी बीड, गटविकास अधिकारी, बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड व विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दिनांक २६ सप्टेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मागणी करुनही अद्याप संबंधित विभागाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही.
(२) होय. निवेदन प्राप्त आहे.
(३) व (४) प्रश्नाधीन "ग्रा.मा. ५४८ नाळवंडी हरिजन वस्ती जोड रस्ता येथे सुधारणा करणे" हे काम करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे पूर्ण करण्यात आले आहे.

अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव यांनी सदर कामाची स्थळपाहणी केली असून, सद्यस्थितीत रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

घोडबंदर (जि.ठाणे) येथील समांतर उभारण्यात येणाऱ्या खाडीकिनारा मार्ग प्रकल्पाबाबत

(११) * १३५ श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील खारेगांव ते गायमुख असा १ हजार ३१६ कोटी १८ लाख इतक्या किंमतीचा १३ कि.मी.लांबीचा खाडी किनारा मार्ग, मुंबई महानगर मुंबई विकास प्राधिकरणामार्फत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तिवरांच्या जंगलांची होणारी कत्तल, सागरी किनारा नियमनाचे कठोर कायदे, नौदलाच्या जागेस खेटून उभारणीमुळे संरक्षण विभागाकडून हरकती असताना तसेच पर्यावरणा संदर्भातील विविध परवानग्या प्राप्त नसतानाही हे काम मेसर्स नवयुग इंजिनियरिंग या वादग्रस्त कंपनीस दिनांक ५ सप्टेंबर,२०२४ रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पाचे काम अद्याप सुरु झाले नसतानाही प्रकल्प खर्चात दुप्पटीने वाढ करुन त्यास एमएमआरडीएने मंजुरी दिल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) ठाणे येथील बाळकुम ते गायमुख या १३.४५ कि.मी. लांबीच्या खाडी किनारा मार्गाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत हाती घेण्यात आलेले असून या कामाची एकूण किमंत रू.३,३६४.६२ कोटी इतकी आहे.
(२) हे खरे नाही.

सदर प्रकल्पाची एकूण लांबी १३.४५ कि.मी. असून यातील ६.६४ कि.मी. लांबीकरिता पर्यावरण विभागाच्या परवानगीची आवश्यकता नाही. सबब, या लांबीकरिता काम सुरु करण्यास कोणताही अडथळा नाही.

उर्वरित ६.८१ कि.मी. लांबीकरिता पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक असून सदर परवानगी प्राप्त करण्याची प्रक्रिया माहे मे, २०२१ पासून ठाणे महानगरपालिकेमार्फत सुरू असून यातील एकूण १५ टप्प्यांपैकी सध्या १४ टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झालेली होती. आता दिनांक ०५.०३.२०२५ रोजी केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाची अंतिम परवानगी प्राप्त झाली आहे. त्यास अनुसरुन दि.०२/०९/२०२४ रोजीच्या प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत सदर प्रकल्पाकरिता निविदा प्रक्रियेतील लघुत्तम निविदाकार मे. नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लि. यांची रू. २,७२७ कोटी ची निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात आली.
(३) अंशत: खरे आहे.

या प्रकल्पाकरिता ठाणे महानगरपालिकेतर्फे सन २०२१ मध्ये केवळ पर्यावरण मान्यतेसाठी प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने ढोबळ अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. या ढोबळ अंदाजपत्रकाची किंमत रू.१३१६.१८ कोटी इतकी होती. प्राधिकरणामार्फत या प्रकल्पाचा सन २०२४ मध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून सविस्तर प्रकल्प अहवालानुसार रू.३,३६४.६२ कोटी इतकी रक्कम होत असून त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त करून पुढील निविदा प्रक्रिया राबविण्यात आली. प्राधिकरणाच्या दि.०२/०९/२०२४ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीत सदर प्रकल्पाकरिता निविदा प्रक्रियेतील लघुत्तम निविदाकार मे.नवयुगा इंजिनिअरिंग कंपनी लि. यांची रू.२,७२७ कोटी रक्कमेचा निविदा स्विकारण्यास मंजूरी देण्यात आली.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही

ब्रम्हपूरी (जि. चंद्रपूर) नगरपरिषद येथे करण्यात आलेल्या भूमीगत नालेबांधकामात झालेला गैरव्यवहार

(१२) * ३१०५ श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) नगरपरिषदेत सन २०२४-२५ या वर्षात झालेल्या भूमीगत नालेबांधकामात एन.पी. पटेल या कंत्राटदाराने अनियमितता व मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदार एन.पी. पटेल व त्यांचे सहकारी सिध्दार्थ नरेन्द्रकुमार लुगांटिया यांनी तत्कालीन मुख्याधिकारी यांच्याशी संगनमत करुन करारनाम्यावर खोटया सह्या करुन रुपये ५३,८६,७३,८००/- कोटी रुपयांच्या देयकांची उचल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नगरपरिषद प्रशासन व शासनाकडे अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असूनही संबंधितांवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अपहारीत रकमेची वसुली करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) हे खरे नाही.

ब्रम्हपूरी (जि.चंद्रपूर) नगरपरिषद क्षेत्रात एन.पी. पटेल या कंत्राटदारांने भूमीगत नालीबांधकामात अनियमीतता केली असल्याबाबतच्या तक्रारी नगर परिषद प्रशासनास व शासनास प्राप्त झालेल्या नाहीत. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत भुयारी गटार योजनेच्या कामाची निविदा प्रक्रिया राबवून रु.१०७.६३ कोटी एल १ निविदाधारक मे.एन.आर.एपीसी.प्रोजेक्ट प्रा.लि. यांना मंजूर करण्यात आली आहे. याबाबत कार्यादेश दि.०९.१०.२०२४ रोजी देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने, भूमीगत पाईपलाईन टाकण्याचे काम कंत्राटदारामार्फत सुरू करण्यात आले आहे. याबाबतचे कुठलेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरणापासून सुरु होणाऱ्या कालव्यातून होणारी गळती थांबविण्याबाबत

(१३) * ९१२ श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) येथील धरणापासून सुरु होणाऱ्या डाव्या कालव्याची लांबी ० ते ७० कि.मी. व उजवा कालवा ६० कि.मी. पर्यंत प्रवाही सिंचनासह कालव्यावर वाकुर्डे बुद्रुक योजना कार्यान्वित असून सदरहू दोन्ही कालव्याच्या गळतीमुळे अनेक गावातील हजारो अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनीचे व पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याला गळती लागल्याने शेतामध्ये सर्वत्र पाणी शिरुन जमिनी नापिक होत असल्याने शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सन २०२२ मध्ये कोटयवधी रुपये खर्च करुन शासनाने कालवा दुरुस्तीचे काम करुनही अद्याप गळती थांबली नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या गळतीमुळे शेतजमीन नापिक झाल्याने ऊस व इतर तत्सम पीकांची उत्पादन क्षमता अत्यंत कमी होणे, शेती मशागतीची कामे योग्यवेळी करता न येणे, दलदलीमुळे ऊस व इतर तत्सम पीके बाहेर काढण्यासाठी येणाऱ्या खर्चात विलक्षण वाढ होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागत असल्याने शेतकरी कर्जबाजारी होत असून त्यांना रोजंदारीवर काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, अल्पभूधारक शेतकऱ्यांनी तसेच लोकप्रतिनिधींनी वारंवार पाटबंधारे खात्याच्या अधिकारी यांना गळती थांबविण्याबाबत मागणी करुनही त्याकडे दुर्लक्ष करुन सदरहू शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरली नाही तर त्यांच्या सातबाऱ्यावर बोजा चढविण्यात येईल अशी धमकी देऊन पाणीपट्टी देयकाची वसुली बळजबरीने कारखान्याच्या देयकातून परस्पर पाटबंधारे खात्याच्या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून केली जात असल्याचे ही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कालव्याची गळती कायमस्वरुपी थांबविण्याकरीता कालव्यातून सोडण्यात येणारे पाणी हे बंदिस्त पाईपलाईनमधून सोडण्यात यावे तसेच ज्या शेतकऱ्यांचे क्षेत्र बाधित होत आहे त्यांना आकारण्यात आलेली पाणीपट्टी माफ करण्यासह सर्व ठिकाणच्या बाधित क्षेत्राचा गावनिहाय सर्व्हे करण्यात येवून सर्व बाधितांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच धरणाचे काम कोट्यवधी रुपये खर्च होऊनही निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

वारणा डावा कालवा कि.मी. ० ते ३८ व वारणा उजवा कालवा ० ते ३० कि.मी. पर्यंत प्रवाही सिंचन केले जाते. डावा कालवा कि.मी.३९ ते ७० मधील मातीकाम व बांधकाम प्रगतीपथावर आहे. तर, उजवा कालवा कि.मी.३० च्या पुढील कामे बंद आहेत. वारणा डावा कालवा कि.मी. ० ते २६ मध्ये व वितरण प्रणालीमध्ये तसेच उजवा कालवा कि.मी.० ते ३० मधील काही भरावाच्या भागातून पाणी गळती असल्यामुळे काही शेतजमीन बाधित होते.
(२) हे खरे नाही. सन २०२२ मध्ये दोन्ही मुख्य कालव्याच्या दुरूस्तीचे काम करण्यात आलेले नाही. धरणाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे विशेष दुरुस्ती / विस्तार सुधारणांतर्गत काम ५०% पूर्ण झाले असून उर्वरित कामे पूर्ण करून गळतीचे प्रमाण नियंत्रणात आणण्याचे नियोजन आहे.
(३) हे खरे नाही.
अशा प्रकारची शेतकऱ्यांची लेखी तक्रार अथवा निवेदन क्षेत्रिय कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(४) हे खरे नाही.
(५) वारणा डावा कालवा कि.मी.१ ते २६ मधील सविस्तर क्षेत्रीय पाहणी करुन गळती थांबविण्यासाठी कालव्याचे अस्तरीकरण व मायनरमधील पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे सुक्ष्म सिंचनासह सोडणेबाबतचे अंदाजपत्रक क्षेत्रीय कार्यालयामार्फत तयार करण्यात आले असून अंदाजपत्रकास व प्रस्तावास मान्यता घेऊन सदर गळती प्रतिबंधक कामे प्रस्तावित करण्याचे नियोजन आहे.

वारणा धरण पाहणी अहवालामध्ये धरणाच्या पुर्ण संचय पातळीस दगडी धरणातुन होणारी गळती मर्यादीत निकषापेक्षा (Permissible Limit) जास्त असलेने केंद्रीय जल आणि उर्जा संशोधन केंद्र, (CWPRS) पुणे संस्थेच्या अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय पाहणी करुन दिलेल्या सुचनांनुसार गळती प्रतिबंधक उपाय योजनेच्या कामास विशेष दुरुस्ती / विस्तार गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम हाती घेण्यात आले आहे. सदरचे ५०% काम पूर्ण झालेले असून उर्वरित कामे पूर्ण करून गळतीचे प्रमाण नियंत्रणात आणण्याचे नियोजित आहे.

कळंब (जि.धाराशिव) नगरपरिषद येथील मुख्याधिकारी यांनी शासकीय निधीचा केलेला अपव्यय

(१४) * ५२९७ श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय निधीचा अपव्यय होऊ नये याकरीता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत राज्यातील विविध शहरात पाणी पुरवठा, मल:निस्सारण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहरांमधील रस्ते प्रकल्प/रस्ते बांधकामाची कामे करण्याबाबत नगरविकास विभागाने दिनांक ११ मे २०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कळंब (जि.धाराशिव) शहरातील विविध भागात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नवीन पाणी पुरवठा योजनेची कामे निविदा स्तरावर असतांनाही कळंब नगपरिषदेच्या मुख्याधिकारी यांनी उक्त शासन

निर्णयाची पायमल्ली करुन शहरातील रस्त्यांच्या कामांना स्थगिती न देता उलट रस्ते बांधकाम व दुरुस्तीचे कामे ठेकेदारास करण्यास प्रवृत्त केल्यामुळे शासनाच्या कोट्यावधी रुपयांच्या निधीचा अपव्यय झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शासन निर्णयान्वये सदरची कामे स्थगित करण्यात यावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष, न.प. कळंब यांनी मुख्याधिकारी, न.पं.कळंब यांचेकडे दि.२०/०१/२०२५ रोजी व तद्नंतर अनेक वेळा करुनही त्याकडे दुर्लक्ष करीत मुख्याधिकारी यांनी कर्तव्यात कसूर करुन शासनाच्या निधीचा अपव्यय केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती गठीत करुन दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी माजी नगराध्यक्ष, न.पं. कळंब यांनी मा.जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे दि.०७/०२/२०२५ रोजी लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणाची चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषीवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील पाणीपुरवठा, मलनिःस्सारण व रस्ते बांधकामाची कामे करताना शहरांमधील रस्ते प्रकल्प / रस्ते बांधकामाची कामे ठराविक क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा / मलनिःस्सारण प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर करण्यात यावीत तसेच, ज्या ठिकाणी पाणीपुरवठा, मलनिःस्सारण प्रकल्पांसोबत समांतरपणे रस्त्यांची कामे देखील केली जात असतील त्या ठिकाणी तयार करण्यात येणारे रस्ते हे पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पांसाठी पुन्हा खोदावे लागणार नाहीत याची देखील दक्षता घेण्यात यावी असा दिनांक ११ मे, २०१७ रोजी शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे.

(२) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत कळंब (जि. धाराशिव) येथील रुपये ६६.१० कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २४ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीस सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया नगरपरिषद स्तरावर सुरू आहे.

कळंब नगरपरिषद क्षेत्रातील नागरिकांची प्राप्त निवेदने, पावसाळयाच्या कालावधीत नागरिकांची गैरसोय होणार नाही व आवश्यक बाब म्हणून विकास कामासाठी जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार रस्त्याची कामे करण्यात आलेली आहेत. त्यात काही रस्त्यांचे मजबुतीकरण झालेले आहेत. काही रस्त्यांना साईड मार्जिन सोडण्यात आलेले आहे. तसेच, पाणीपुरवठा योजनेत काम करतेवेळी खोदकामाने ना दुरुस्त होणाऱ्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी अंदाजपत्रकामध्ये तरतूद ठेवण्यात आलेली आहे.

कळंब नगरपरिषद क्षेत्रासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत एकूण ६० कामे व जिल्हा वार्षिक योजनेमधील १५ कामे पाणी पुरवठा प्रकल्पामुळे बाधित होत असल्यामुळे त्यासाठी पुन्हा रस्ते खोदावे लागणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर कामास कळंब नगरपरिषद मार्फत कार्यारंभ आदेश व नाहरकत प्रमाणपत्र दिलेले नाही.

(३) माजी नगराध्यक्ष, कळंब नगरपरिषद यांचे निवेदन दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी कळंब नगरपरिषदेस प्राप्त झाले असून त्यानुसार, कळंब नगरपरिषद क्षेत्रासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत मंजूर एकूण ६० कामे व जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ मधील १५ कामे पाणी पुरवठा प्रकल्पामुळे बाधित होत असल्यामुळे त्यासाठी पुन्हा रस्ते खोदावे लागणार नाहीत याची दक्षता घेऊन सदर कामास कार्यारंभ आदेश व नाहरकत प्रमाणपत्र नगरपरिषदेने दिलेले नाही. तसेच, सद्यस्थितीत जिल्हा वार्षिक योजना २०२३-२४ अंतर्गत चालू असलेली सर्व रस्त्यांची कामे थांबविण्यात आलेली आहेत.

(४) व (५) कळंब नगरपरिषद क्षेत्रातील रस्त्यांच्या अनुषंगाने माजी नगराध्यक्ष, कळंब नगरपरिषद यांचे निवेदन जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या कार्यालयास प्राप्त झाले असून त्यानुषंगाने शासकीय निधीचा अपव्यय न होता नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत मुख्याधिकारी, कळंब नगरपरिषद यांना जिल्हाधिकारी कार्यालयाने कळविले आहे. तसेच, सदर प्रकरणात चौकशी समिती गठित करण्यात येत असल्याचे जिल्हा सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांनी कळविले आहे.

तुमसर (ता.तुमसर, जि.भंडारा) येथे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(१५) * ५९०६ श्री.राजू कारेमोरे (तुमसर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (ता.तुमसर, जि.भंडारा) शहरात महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणीपुरवठा योजना राबविण्यात येत असून सदर पाणी पुरवठयाच्या कामाचे कंत्राट रु.३७,४८,६९,०९७.०० (४२.६८ टक्के जास्त) नागपूर येथील मे. प्रितीपाल सिंग ॲण्ड कंपनी यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे काम संथ गतीने सुरु असून त्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या साहित्याचा वापर होत आहे तसेच काही ठिकाणी कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देऊन सुध्दा त्यांनी आजपर्यंत कामाला सुरुवात केलेली नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरीकांना पाण्याअभावी त्रास सहन करावा लागत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांना दिनांक २६ जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तुमसर वासियांना सुरळीत पाणीपुरवठा होण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच संबंधित कंत्राटदार व अधिकारी कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत तुमसर शहराच्या रुपये ४७.६९ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक २८ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पातील बांधकाम व वितरण नलिकेच्या कामाची निविदा प्रक्रिया सदर प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व तुमसर नगरपरिषदेने राबवून मे. प्रितीपाल सिंग अँड कंपनी, नागपूर यांना रुपये ३७,४८,६९,०९७ (३.८४ % जास्त दराने) यांना दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(२) तुमसर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या निविदेतील सर्व कामे जवळपास पूर्ण होत आली आहेत. तथापि, वितरण व्यवस्थेत टाकण्यात आलेली ११० मीमी व्यासाचे काही पाईप चाचणी सुरू असताना फुटत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे, कंत्राटदाराने सदोष पाईप लाईन बदलवलेले असून ०८ झोन पैकी ०५ झोनचा पाणीपुरवठा सुरळीत केलेला असून उर्वरित ०३ झोनची चाचणी सुरू असून त्यापैकी ०२ झोनचा पाणीपुरवठा ५० % सुरू झालेला आहे व १ झोनची चाचणी सुरू आहे. यामुळे प्रकल्प कार्यान्वित होण्यास विलंब झालेला आहे.

सद्यस्थितीस प्रकल्पाची ९५ % भौतिक प्रगती झालेली असून पुढील एक महिन्यात उर्वरित पूर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे. तसेच, प्रकल्पाचे काम जलदगतीने पूर्ण करण्याचे निर्देश नगरपरिषद मार्फत देण्यात आलेले असून प्रकल्पाच्या विलंबाकरिता कंत्राटदाराच्या देयकामधून दंड वसूल करण्यात येणार असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

(३), (४) व (५) तुमसर शहर पाणीपुरवठा प्रकल्पाच्या अनुषंगाने सन्माननीय लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झालेले असून त्यानुषंगाने सन्माननीय लोकप्रतिनिधींच्या निवेदनामध्ये उपस्थित मुद्द्यांच्या अनुषंगाने तपासणी करून याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास कळविण्यात आलेले आहे.

जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात विकासकाने म्हाडाला देय असलेले अतिरिक्त चटई क्षेत्रफळ न देता परस्पर विक्री केल्याबाबत

(१६) * ३६३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या (म्हाडा) जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात म्हाडा कायद्यानुसार अतिरिक्त चटई क्षेत्रफळाचा लाभ घेणाऱ्या विकासकांना ठराविक चटई क्षेत्रफळ सदनिकांच्या स्वरुपात म्हाडाला सुपूर्द करणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकासकांनी ४६० प्रकल्पात १ लाख ४९ हजार ८०८ चौ.मी. अतिरिक्त चटई क्षेत्रफळ सुपूर्द होणे आवश्यक असतानाही आतापर्यंत केवळ ८४ हजार ७४ चौ.मी. अतिरिक्त चटई क्षेत्रफळाच्या सदनिका अद्यापही म्हाडाला सुपूर्द केल्या नसल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईतील ताडदेव येथील एका विकासकाने पुनर्विकास प्रकल्पातील म्हाडासाठी राखीव अतिरिक्त बांधकाम क्षेत्रातील सुमारे चार कोटीच्या ६ सदनिका परस्पर विक्री केल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन संबंधित विकासक तसेच यातील दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह विकासकांकडून देय अतिरिक्त चटई क्षेत्रफळाच्या सदनिका तात्काळ ताब्यात घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) व (२) विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) अंतर्गत पुनर्विकास होणाऱ्या ४५९ प्रकल्पांमध्ये मंडळास एकूण १६२९५८.६७ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ (Surplus area) प्राप्त होणार आहे. त्यापैकी जुलै २०२४ अखेरीस पूर्ण झालेल्या प्रकल्पामधून ७७९७५.४५ चौ.मी.अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ प्राप्त झाले आहे. तसेच अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ ३९४९.३४ चौ.मी.च्या बदल्यात शिघ्र सिध्द गणक दराच्या प्रमाणानुसार (Ready Reckoner) देय होणारी रुपये ५८.५० कोटी इतकी रक्कम मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त झाली आहे. उक्त नमूद ८१९२४.७९ चौ.मी.इतके अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास प्राप्त झाले आहे. ७०७८३.६३ चौ.मी. इतके क्षेत्रफळ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मंडळास प्राप्त होणार आहे.

अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ राखीव न ठेवता त्यांची विक्री करून त्रयस्थ हक्क निर्माण केल्या प्रकरणी ३६ दोषी मालक/विकासकांच्याविरुद्ध आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. त्यापैकी १३ दोषी मालक/विकासक यांनी देय असलेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ सुपूर्द करुन दंडात्मक रक्कमेचा भरणा केला आहे. उर्वरित २३ पैकी २१ प्रकरणी दोषी मालक/ विकासक यांच्या मालमत्ता जप्त करण्याबाबतची कार्यवाही करण्याकरीता मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी दिनांक ०५.१२.२०२२ रोजी पारित केलेल्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना कळविले असून याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडे सुरू आहे. तसेच २ प्रकरणापैकी एका प्रकरणी विकासकाने अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास हस्तांतरीत केले असून दंडात्मक रक्कमेचा भरणा केलेला नाही व अन्य एक प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

तसेच, मा. उच्च न्यायालय/मा.शहर दिवाणी न्यायालय येथे दोषी मालक/विकासक यांच्या विरुध्द एकूण १७ प्रकरणी मंडळाने पुनर्प्राप्ती याचिका दाखल केली असून उर्वरित प्रकरणी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत पुनर्प्राप्ती याचिका दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) व (४) ताडदेव मुंबई येथील वाडीया हाऊस या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता मंडळातर्फे देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्रातील अटीनुसार विकासकातर्फे मंडळास २६४.५४ चौ.मी. अतिरीक्त बांधकाम क्षेत्रफळ देय आहे. सदरहू क्षेत्रफळाचे शिघ्र सिध्द गणक दराच्या प्रमाणानुसार (Ready Reckoner) १९८.४३ चौ.मी. समकक्ष बांधकाम क्षेत्रफळ विकासकाने हस्तांतरीत केले आहे. तथापि, ६६.११ चौ.मी. अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास येणे बाकी आहे.

विकासकाने उर्वरित अतिरिक्त बांधकाम क्षेत्रफळ हस्तांतरीत न केल्याने, विकासकाविरुध्द आर्थिक गुन्हे शाखा येथे प्रथम खबरी अहवाल (FIR) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच विकासकाविरुध्द जप्तीबाबत कारवाई करण्याचे प्रस्तावित होते.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक १८८५७/२०२४ मधील दि.२०.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विकासकाविरुध्द पुढील सुनावणीपर्यंत कोणतीही कारवाई न करण्याबाबत निर्देश दिले आहेत. सदर प्रकरण मा.उच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

विदर्भातील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान अदयाप मिळाले नसल्याबाबत

(१७) * १२०१ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाने विदर्भातील ५ हजार प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना ८३२ कोटी रूपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर केल्याचे माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भातील ५ हजार प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मंजूर करण्यात आलेले सानुग्रह अनुदान अदयाप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे निधीची मागणी केली नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना ८३२ कोटी रूपयांचे सानुग्रह अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन : (१) होय, हे खरे आहे.

(२) अनुदान रकमेच्या भुगतानास सक्षम स्तरावरुन मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३), (४) व (५) विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ यांनी विविध प्रकल्पासाठी शासनाकडे निधी मागणी नोंदविली होती. उपलब्ध अनुदान महामंडळास वितरित करण्यात आले आहे. त्याबाबत अनुदान रकमेच्या भुगतानास सक्षम स्तरावरुन मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

मंगळवार पेठेतील (जि. पुणे) मोक्याची दोन एकर जागा राज्य रस्ते विकास महामंडळाने खाजगी कंपनीला दिल्याबाबत

(१८) * १६७५ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील मंगळवार पेठेतील मोक्याची दोन एकर जागा राज्य रस्ते विकास महामंडळाने अवघ्या ६० कोटी रुपयांना खाजगी कंपनीला दिल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील काही विभागांची कार्यालये वर्षानुवर्षे होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील जागा खाजगी विकासकाला देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे : (१) सदर जागा खाजगी विकासकास दिनांक २८.०२.२०२४ या पत्रान्वये रक्कम रुपये ६०.११ कोटी लीज प्रिमियम व रुपये ८.९० लक्ष वार्षिक भाडेपट्टा रक्कम वर भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर शासकीय जमीनीच्या विकासाच्या प्रस्तावास व सदर जागा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास हस्तांतरीत करण्यास दिनांक ०५.०७.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

सदर शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने धारण केलेल्या जमीनीची दि.११.०५.२०१८ च्या अधिसूचनेमधील नियमानुसार विल्हेवाट लावल्यानंतर प्राप्त होणाऱ्या उत्पन्नातून भांडवली खर्च भागविण्याच्यादृष्टीने महामंडळाने या जागेचा व्यापारी व वाणिज्यिक तत्वावर विकास करुन उत्पन्न व आर्थिक लाभ घेण्याकरीता सदर जागा खाजगी विकासकास ६० वर्षाच्या भाडेतत्वावर हस्तांतरीत केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

भिवंडी-निजामपूर (जि.ठाणे) शहर महानगरपालिकेत नगरोत्थान महाअभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामात झालेला गैरव्यवहार

(१९) * १९१५ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे सन २०११ ते २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या कामांमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त महापालिका कार्यक्षेत्रात महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ अंतर्गत करण्यात आलेली एस.टी.पी. व मलनि:सारण वाहिनीची अत्यंत निकृष्ट दर्जाची व अपूर्ण कामे, महत्वाच्या रस्त्यांची झालेली दुरवस्था, प्रदूषण, वाहतूक कोंडी या समस्यांना नागरीकांना सामोरे जावे लागत असताना त्याची कोटयवधी रुपयांची देयके कंत्राटदारांना अदा करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कचरा ठेकेदार मे.ॲन्थनी वेस्ट हॅन्डलिंग सेल प्रा.लि. यांना १५ कोटी रुपये देणे, सेह निर्माण संस्था यांनी शहरातील मालमत्तांचे जी.आय.एस. कर आकारणी बाबतच्या सर्वेक्षणाचे काम चुकीचे करुन सुध्दा सदर संस्थेला ३०४२ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे चाविंद्रा / पोगांव येथील आरक्षण क्र.१२४ अ या जागेतील प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत EWS व्यक्तीकरीता ६३४८ च्या घराचे काम अपूर्ण असून त्या कामातही मोठया प्रमाणात अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर कामांची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २३ जुलै, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(६) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) खरे नाही.
(२) खरे नाही.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ अंतर्गत करण्यात आलेली एस.टी.पी. व मलःनिस्सारण वाहिनीच्या कामाअंतर्गत मल:वाहिन्या अंथरण्याकरीता खोदण्यात आलेल्या रस्त्यांची दुरुस्ती वेळोवेळी करण्यात आलेली असल्याने काम चालू असताना रस्त्यांवर वाहतुक कोंडीचा प्रश्न निर्माण झाल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच, सदर योजनेंतर्गत काम सुरु असताना प्रदूषण रोखण्यासाठी योग्य त्या मार्गदर्शक मानकांचा अवलंब करून काम केले आहे.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत भुयारी गटार योजना टप्पा-२ चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ठाणे हे तांत्रिक सल्लागार असून त्यांचे मार्फत पुर्ण झालेल्या कामाचे मोजमाप व गुणवत्ता तपासली जाते. तसेच, या कामांची गुणवत्ता तपासणीसाठी त्रयस्थ तांत्रिक लेखापरिक्षण यंत्रणा म्हणून कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पुणे (COEP) यांच्याकडून काम समाधानकारक व गुणवत्तापुर्ण आहे किंवा नाही याबाबतचा अहवाल वेळोवेळी प्राप्त करून घेण्यात येतो. त्यांचेकडून कामे समाधानकारक व गुणवत्तापूर्ण झाल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच संबंधीत ठेकेदारास देयके प्रदान करण्यात आलेली आहे.
(३) खरे नाही.

घनकचरा व्यवस्थापनासाठी मे.ॲन्टोनी वेस्ट हॅडलिंग सेल यांचे सोबत दि.१५ ऑक्टोबर, २००५ रोजी करार करून त्यांना घनकचरा व्यवस्थापनाची कामे करण्याचे कंत्राट देण्यात आलेले होते. सदर ठेकेदाराने करारातील अटी व शर्तींचा भंग केल्याने उक्त कंत्राट दि. ०१ ऑक्टोबर, २०११ रोजी रद्द केले आहे.सदर ठेकेदार यांना देण्यात आलेल्या कंत्राटाच्या अनुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयात महानगरपालिकेने याचिका दाखल केली असून सदर प्रकरणाची सुनावणी प्रलंबित असून अद्यापपर्यंत सबंधित ठेकेदारास कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात शहरातील मालमत्तांचे जी.आय.एस. सर्वेक्षण करणेकामी मे.सेह निर्माण संस्था यांना विहित कार्यपद्धतीचा अवलंब करून कंत्राट देण्यात आले होते. सदर संस्थेने केलेल्या कामाच्या अनुषंगाने मंजूर निविदा दराने रु. ३.०९ कोटी इतके देयक अदा करण्यात आले आहे.
(४) खरे नाही.

सुधारित प्रकल्प अहवाल तयार करुन केंद्र व राज्य शासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरू आहे.
(५) खरे आहे.

महानगरपालिकेचे महालेखापाल,मुंबई यांच्यामार्फत नियमितपणे लेखापरीक्षणाची कार्यवाही केली जाते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात बेदाण्यावरील वस्तू आणि सेवा कर रद्द करण्याबाबत

(२०) * ११५२ श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात द्राक्षापासून तयार होणाऱ्या बेदाण्यावरील ५ टक्के वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) रद्द करण्याची घोषणा शासनाने माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परंतु हा बेदाणा शेतकऱ्यांना शीतगृहात ठेवण्याकरिता १८ टक्के वस्तू आणि सेवा कर द्यावा लागतो यासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच खते, औषधे व अवजारे खरेदी करताना शेतकऱ्यांना वस्तू आणि सेवा कर द्यावा लागतो त्याचा परतावा व्यापाऱ्यांना मिळतो पण शेतकऱ्यांना मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बेदाणाचा समावेश शालेय पोषण आहारात करण्याबाबतच्या निर्णयावर अद्यापपर्यंत अंमलबजावणी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अजित पवार : (१) होय, हे खरे आहे.

शेतकऱ्याने विकलेल्या बेदाण्यावर जीएसटी लागत नाही असे स्पष्टीकरण दि.२१.१२.२०२४ रोजी झालेल्या जीएसटी कॉन्सिल च्या ५५ व्या बैठकीत देण्यात आले आहे व त्यानुसार परिपत्रक (२४७/०४/२०२५-GST दि.१४.०२.२०२५) देखील काढण्यात आलेले आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

बेदाण्याचा समावेश शालेय पोषण आहारामध्ये करण्याबाबतचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही असे शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने कळविले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वांद्रे येथील शासकीय जमिनीवर बेकायदेशीररित्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात आल्याबाबत

(२१) * ४५५२ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वांद्रे (पूर्व) शासकीय वसाहत न.भू.क्र.६२९ येथील शासनाच्या अनिवासी गाळे वाटप जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जागा ही शासनाची असताना देखील त्यावर बालाजी शॉपकीपर्स, प्रीमायसेस सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या नावे गणनाकृत झोपडपट्टी असा उल्लेख करून झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मंजूरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, झोपडपट्टी पुनर्वसन योजना मंजूरीसाठी सादर केलेली कागदपत्र बनावट असल्याचे आयुक्तांनी स्पष्ट केले असून त्यावर संबंधितांनी निर्णय घ्यावा असे आदेश देऊन देखील अद्याप पर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) व (२) हे खरे आहे.

शासकीय मालकीच्या जमिनीवर न.भू.क्र.६२९ (भाग), बांद्रा गांव, येथे बालाजी शॉपकिपर्स प्रिमायसेस को.ऑप. सोसा.लि. यांनी विकासक मे. आशापुरा डेव्हलपर्स यांच्याव्दारे दिनांक २३.०३.२००६ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सदर झोपडपट्टी पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केला. सदर प्रस्तावाचा परिशिष्ट-२ अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) यांनी दिनांक ३१.१०.२००६ रोजी पारीत केले असून, त्यात त्यांनी सदर वसाहत शासनाच्या अभिलेखानुसार गणनाकृत झोपडपट्टी आहे असे नमुद केले आहे.

(३) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र बनावट असल्याचे मा. राज्य माहिती आयुक्त, यांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी दिलेल्या आदेशानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी घेतलेल्या सुनावणीमध्ये मिळकत पत्रिकेनुसार सदर भुखंड हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीचा नसून महाराष्ट्र शासनाच्या मालकीचा आहे असे निष्पन्न झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे आक्षेप फेटाळण्यात आले व दि.१२.०३.२०२० रोजी तसे आदेश पारीत करण्यात आले.

(४) विषयांकीत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची जमिन शासनाच्या मालकीची असल्याने विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) मधील नियम २.८ नूसार जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्याकडे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता दि.२३.०२.२०१७ रोजी झोपुप्रा कडून प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानूसार ना-हरकत प्रमाणपत्र एक महिन्यामध्ये प्राप्त न झाल्याने याबाबत जमिन मालकाची मानीव ना-हरकत गृहित धरुन प्राधिकरणामार्फत पुढील कार्यवाही करण्यात आल्याचे आढळून आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील टँकर लॉबीकडून विनापरवाना विहिरीतून पाण्याचा बेसुमार होत असलेला उपसा

(२२) * ४२४७ अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजन नाईक (नालासोपारा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ. जितेंद्र सतिश आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड): सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेचे कोणतेही नियंत्रण नसल्याचा गैरफायदा घेत टँकर लॉबीकडून शहर व उपनगरात सुरु असलेल्या विविध प्रकल्पांसाठी विहिरीतून दिवसाकाठी ५०० दशलक्ष लिटर म्हणजे ५० कोटी लिटर पाण्याचा उपसा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परवाने घेतले जातात कि नाही याकडे पालिकेने दुर्लक्ष केल्यामुळे विनापरवानाच विहिरीतून पाण्याचा बेसुमार उपसा सुरु असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विहिरी आणि बोरवेल मधून दररोज पाण्याचा बेसुमार उपसा सुरु असल्याने भूजलपातळी कमी होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्रीय जल प्राधिकरणाने सन २०२० मध्ये विहीर, तलाव आणि बोरवेल आदि मधून पाण्याच्या उपसावर नियंत्रण करण्यासाठीच्या मार्गदर्शक तत्वांकडे पालिकेचे सर्रास दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करुन टँकर लॉबीकडून विनापरवाना होत असलेल्या बेसुमार पाणी उपसावर नियंत्रण आणण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील कलम ३९४ नुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर व्यवसायिकास बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवाना देण्यात येतो. सन २०१७ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परिक्षेत्राकरिता निश्चित केलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणात्मक निर्देशांचे पालन करणे परवानाधारकास बंधनकारक आहे.

(२) आजमितीस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत ९१५ पाणी वाहून नेणाऱ्या टँकर करिता अनुज्ञापनपत्र देण्यात आले आहे. विनापरवाना पाणी वाहून नेणाऱ्या टँकरवर मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३९४ नुसार कारवाई करण्यात येते.

(३) महाराष्ट्र भूजल अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार मुंबई शहर व मुंबई उपनगरे या शहरांव्यतिरिक्त राज्यात इतर ठिकाणी भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) यांचेकडून भूजल सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगरे येथे भूजल सर्व्हेक्षण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

केंद्रीय भूमिगत जल प्राधिकरण (CGWA) यांची परवानगी असल्याशिवाय कोणत्याही विहीर अथवा बोरवेल खोदण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी देण्यात येत नाही. तसेच, पाणी वाहून नेणाऱ्या टँकरला तसेच विहिरींमधील पाणी वाहून नेण्याकरीता असलेल्या मार्गदर्शक तत्वाचे पालन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येते.

(५) बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत एकूण ९१५ पाणी वाहून नेणाऱ्या टँकर करिता अनुज्ञापनपत्र देण्यात आले आहे. ६८ विनापरवाना टँकर मालकांवर मा. जिल्हा दंडाधिकारी न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत .

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

खामगाव (जि.बुलढाणा) शहरातील जलस्त्रोत दूषित झाल्याबाबत

(२३) *२४१५ डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) शहरातील जलस्त्रोत दूषित झाल्यामुळे अशुध्द पाणी पुरवठा होत असून नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील अशुध्द पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी केलेल्या तपासणीत शहरातील नगरपालिकेच्या ३४० कूपनलिका व अनेक खाजगी जलस्त्रोत दूषित असल्याचा अहवाल समोर आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन खामगाव शहरास शुद्ध पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) हे खरे नाही.

खामगांव नगरपरिषदेमार्फत प्रत्येक विभागातील पाणी नमुने वारंवार घेवुन तपासणी करिता जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, बुलढाणा येथे पाठविण्यात येतात. जानेवारी महिन्यामध्ये देखील पाणी नमुने तपासणी करीता पाठविण्यात आले होते. सदर पाणी तपासणी अहवालात पाणी पिण्यास योग्य असल्याचे नमूद केले आहे. तसेच खामगांव शहरात नगर परिषदेच्या मालकीच्या ३५० कुपनलिका व ५ विहिरी कार्यान्वित आहेत. या जलस्त्रोतातील पाण्याचा वापर पिण्यासाठी न करता घरगुती वापरासाठी करण्यात येतो.

(४) सद्यस्थितीत खामगांव शहरात जुनी वितरण व्यवस्थेवरुन पाणी पुरवठा करण्यात येत असून ज्ञानगंगा प्रकल्पावरील जळका भडंग येथे पाणी शुध्दीकरण केंद्र अस्तित्वात आहे. तसेच लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजना सुरु आहे. या योजनेचे ९५% काम पूर्ण झाले आहे. तसेच खामगांव शहराची हद्दवाढ व वाढीव लोकसंख्या विचारात घेता खामगांव शहरात वाढीव पाणी पुरवठा योजना प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेत भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(२४) * ३२२८ श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेत ३५०भूसंपादनाची प्रकरणे प्रलंबित असतानाही केवळ ११ विशिष्ट प्रकरणांमध्ये कोट्यवधी रुपयांचा मोबदला देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणतेही भूसंपादन करताना अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीची मान्यता आवश्यकता असतानाही तत्कालीन नगररचना उपसंचालकांनी प्राधान्यक्रम समितीसमोर सदर ११ प्रकरणे सादर न करताच संबंधित भूसंपादन प्रकरणे मंजूर केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन भूसंपादनाची प्रलंबित सर्व प्रकरणे तात्काळ निकाली काढणे, उक्त विशिष्ट ११ प्रकरणांची चौकशी करून दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) प्रस्तुत प्रकरणी मा.विधानसभा सदस्य ॲड.श्री.राहुल उत्तमराव ढिकले यांनी, दि.१७.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, प्रस्तुत प्रकरणाची चौकशी करण्याची विनंती शासनास केली आहे.
(२) हे खरे नाही. महानगरपालिका क्षेत्रातील भूसंपादनाचे प्रस्ताव प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी महानगरपालिका आयुक्त त्यांचे सहायासाठी प्राधान्यक्रम समितीची स्थापना करतात. विषयांकित प्रस्तावांमध्ये आयुक्त यांनी स्थायी समितीची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही केलेली आहे.

तसेच महानगरपालिकेतील उपसंचालक. नगररचना यांना भूसंपादन प्रस्ताव मंजुर करण्याचा अधिकार प्राप्त नाही. त्यामुळे तत्कालीन उपसंचालक, नगर रचना, नाशिक महानगरपालिका यांनी त्यांच्या स्तरावर कोणताही भूसंपादन प्रस्ताव मंजूर केलेले नाहीत.

ज्या भूसंपादन प्रस्तावामध्ये देयक अदा करणेत आलेले आहेत, त्यास महानगरपालिका आयुक्त यांचे प्राथमिक मान्यता व स्थायी समिती यांची मान्यता घेऊन रकमा मा.न्यायालय तसेच भूसंपादन अधिकारी यांचेकडे वर्ग करणेत आलेल्या आहेत.
(३), (४) व (५) होय. याप्रकरणी, शासनाने महानगरपालिकेस कळविलेनुसार सदर प्रस्तावांची महानगरपालिकास्तरावर तपासणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील अनेक विकास प्रकल्पांना महारेराने बजाविलेल्या नोटीसा

(२५) * ५०० श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महारेराने राज्यातील १९५० प्रकल्पांवर स्थगितीची कारवाई केल्याने अनेक गृह प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महारेराकडे गृहनिर्माण प्रकल्पाच्या नोंदणीच्या वेळी प्रकल्प पुर्ततेची दिलेली तारीख उलटून गेली तरी कुठलीही माहिती अद्ययावत न करणाऱ्या राज्यातील १०७७३ प्रकल्पांना महारेराने कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या असून त्यांचे प्रकल्पाचे बँक खाते गोठविण्यात येवून प्रकल्पाशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध घालण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बांधकाम क्षेत्रात पारदर्शकता, जबाबदारी, आर्थिक शिस्त निर्माण होऊन घर खरेदीदारांच्या हिताचे रक्षण होणार असल्याने महारेरा कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१), (२) व (३) हे खरे आहे.

महारेराने दि.१९.०१.२०२५ पर्यंत १०,७७३ प्रकल्पांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून, त्याव्दारे विकासकांनी ३० दिवसांत प्रकल्प पुर्ण करण्याबाबत मुदत वाढीचा अर्ज किंवा भोगवटा प्रमाणपत्र महारेराकडे सादर करावे, अन्यथा महारेरा संकेत स्थळावर प्रकल्पास तात्पुरती स्थगिती (Abeyance) करणे, बँक खाती गोठविणे व प्रकल्पांशी संबंधित व्यवहारांवरही निर्बंध आणणे इत्यादी कारवाई बाबत नोटीस बजाविण्यात आलेली आहे. सदर १०,७७३ प्रकल्पांपैकी १९५० प्रकल्पांचे बँक खाते गोठविण्यात आले होते. त्यापैकी १०६ विकासकांनी प्रकल्पांचा वेळ वाढवून घेणे किंवा प्रकल्पांचे भोगवटा प्रमाणपत्र दिल्याने त्यांच्यावरची तात्पुरती स्थगितीबाबतची (Abeyance) कारवाई मागे घेण्यात आली आहे. नोटीसा दिलेल्या १०,७७३ प्रकल्पांपैकी उर्वरित ८,८२३ प्रकल्पांच्या छाननीची कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील अंधेरी व्हिलेज, के वेस्ट वार्ड येथे चांदिवाला डेव्हलपर्स यांनी केलेला गैरव्यवहार

(२६) * ६३१० श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील अंधेरी व्हिलेज, के वेस्ट वार्ड येथे चांदिवाला डेव्हलपर्स यांनी तलाव मार्केट (एसआरए) गृहनिर्माण संस्था सीटीएस नं.८१५ या ठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील लाभार्थ्यांची संख्या वाढवून विक्रीघटक वाढीव चटईक्षेत्र एफएसआयचा लाभ घेऊन केलेला गैरव्यवहार व खोटी कागदपत्रे सादर करुन इमारतीचे बांधकाम केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकाच कुटुंबातील इकबाल डोसानी, झुबेदा इकबाल डोसानी व फिरोज अब्दुला डोसानी यांनी नियमबाह्यरित्या सदनिका हडप केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पुनर्वसन योजनेत विकासकाशी संगनमत केल्याने महापालिका व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे अधिकारी यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित विकासक व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

दि.१९/०१/२००६ रोजी पारीत केलेल्या परिशिष्ट-II नुसार झोपडीधारकांची पात्रता पुढीलप्रमाणे आहे:-

एकूण झोपडीधारकांची संख्या - १०७

पैकी पात्र झोपडीधारक - १०२

पैकी अपात्र झोपडीधारक - ०५

सदर योजनेतील एकूण १०२ पात्र झोपडीधारकांपैकी ७८ झोपडीधारकांची पात्रता उपजिल्हाधिकारी (अति./निष्का.) तथा सक्षम प्राधिकारी, अंधेरी यांच्या दि.०३/१०/२०१२ रोजीच्या अहवालानुसार रद्द करण्यात आली होती. परंतु सदर ७८ झोपडीधारकांची पात्रता शिखर तक्रार निवारण समिती यांच्या दि.२३/०९/२०२० रोजीच्या आदेशान्वये कायम ठेवण्यात आली आहे. त्यामुळे मुळ १०२ पात्र झोपडीधारकांच्या संख्येमध्ये फरक पडलेला नाही.

सदर योजनेमध्ये विकास नियंत्रण नियमावली-१९९१ मधील नियम ३३ (१०) अन्वये प्रति हेक्टरी ५०० सदनिका घनतेच्या अनुषंगाने १३० पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम झाले. यात १०२ पात्र व २८ प्रकल्पग्रस्त सदनिका अंतर्भूत केलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सहकार कक्षाकडील उपलब्ध अभिलेखाची पडताळणी केली असता, १) झोपडीधारक झुबेदा इकबाल डोसानी (परि.२ अ.क्र. १७ निवासी पात्र) यांना दि.२०.०३.२०१९ रोजी सोडतीद्वारे इमारत क्र.३ मधील सदनिका क्र.४०३ वाटप करण्यात आलेली असल्याचे दिसुन येते. २) तसेच संस्थेकडुन प्राप्त झालेल्या माहितीनुसार झोपडीधारक इकबाल डोसानी (परि. २ अनु.क्र. ०३ अनिवासी पात्र) यांना इमारत क्र.४ मधील गाळा क्र.०७ चे वाटप दि.०९.१०.२०१३ मध्ये विकासक स्तरावर करण्यात आलेले आहे. ३) झोपडीधारक फिरोज अब्दुल डोसानी (परि.२ अ.क्र.०४ अनिवासी पात्र) यांना इमारत क्र.४ मधील गाळा क्र.०२ चे वाटप दिनांक ०९.१०.२०१३ मध्ये विकासक स्तरावर करण्यात आलेले आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर शहरात स्वच्छता व्यवस्थापनासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंपन्यांनी केलेला गैरव्यवहार

(२७) * ७०८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात स्वच्छता व्यवस्थापनांतर्गत कचरा संकलन व वाहतुकीसाठी ए.जी.एन्व्हायरो आणि बीव्हीजी इंडिया तसेच कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया करण्यासाठी सुसबिडी कंपनी आणि सल्लागार म्हणून केपीएमजी कंपनी या खाजगी कंपन्यांसोबत करार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीनही कंपन्यांकडून कचऱ्याचे योग्य वर्गीकरण न होणे, कचऱ्यामध्ये दगड, वाळू, मलबा मिसळणे, कचरा निवासी भागात टाकणे, निवासी भागात कचरा दुसऱ्या वाहनात हस्तांतरीत करणे, कचऱ्यावर पुनर्प्रक्रिया न करणे इत्यादी अनियमितता करण्यात येत असून मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने तीन वर्षांपूर्वी यातील दोन ऑपरेटर कंपन्यांचे करार रद्द करण्याचा ठराव मंजूर करुनही प्रशासनाने अद्यापही सदर कंपन्यांचे करार रद्द केलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर शहराचा स्वच्छता मानांकन यादीतील क्रमांक २७ वर घसरला असून कचऱ्याची योग्य विल्हेवाट करण्यात येत नसतानाही याच कंपन्यांना पुन्हा कोट्यवधी रुपयांची कंत्राटे व देयके देण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी अनेक लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रारी करुनही यासंदर्भात कोणतीही ठोस कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शहरातील स्वच्छता व्यवस्थापनाचे योग्य नियोजन करण्यास अपयशी ठरलेल्या यातील दोषी कंपन्या व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे आहे,

नागपूर महानगरपालिका हद्दीतील कचरा संकलन व वाहतूक करण्याकरिता ए.जी.इनव्हायरो प्रा.लि. या एजन्सीसोबत दि.३१.०१.२०२० रोजी व मे.बि.व्ही.जी. इंडिया लि. या एजन्सीसोबत दि.१७.०२.२०२० रोजी करारनामा करण्यात आला आहे. तसेच कचऱ्यावर पुर्नप्रक्रिया करण्यासाठी सुसबिडी कंपनीसोबत दि.१३.०४.२०२३ व सल्लागार म्हणून केपीएमजी कंपनीसोबत दि.२७.१२.२०२२ रोजी करारनामा करण्यात आला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे,

कचऱ्यामध्ये दगड, वाळू, मलबा मिसळणे, कचरा निवासी भागात टाकणे, निवासी भागात कचरा दुसऱ्या वाहनात हस्तांतरित करणे, कचऱ्यावर पुनप्रक्रिया न करणे या बाबी आढळून आल्या नसून कचरा संकलन व वाहतूक करणाऱ्या दोन्ही एजन्सीकडून करारनाम्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले आहे.

VTMS (Vehicle Tracking Monitoring System) प्रणालीच्या अनुषंगाने प्राप्त अहवालानुसार दोन्ही एजन्सीद्वारे Route Coverage पूर्ण होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने सदर एजन्सींवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही,

नागपूर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने सदर कंपन्याचे करार रद्द करण्याचा कोणताही ठराव पारित केला नाही. तथापि, याअनुषंगाने कायदेतज्ज्ञांचे मत घेण्याबाबत दिनांक २९.०१.२०२२ रोजी ठराव पारित केला आहे. त्याअनुषंगाने कायदेतज्ज्ञांनी अभिमत दिले आहे. त्यानुसार कंपन्यांचे करारनामे रद्द न करता निविदेतील तरतुदींनुसार त्यांच्या कामाचे मूल्यमापन व पर्यवेक्षण करण्यात आले आहे.
(४) हे खरे नाही,

स्वच्छ सर्वेक्षणानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मानांकनात सन २०२२ मधील १२४, ODF++ वरून सन २०२३ मध्ये ८६, water+ अशी सुधारणा झाली आहे. या एजन्सींसोबत करारनामा सुरू असून नव्याने कंत्राट देण्यात आलेले नाही.
(५) व (६) एजन्सींच्या कामाबाबत प्राप्त तक्रारींचा आढावा घेऊन कचरा संकलनाकरिता वाहनांची संख्या वाढविण्याकरिता दोन्ही एजन्सीला नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यामुळे व Route Coverage पूर्ण होत नसल्यामुळे त्यांच्या मासिक देयकामधून दंडात्मक रक्कम कपात करण्यात येत आहे. त्याअनुषंगाने महानगरपालिकेद्वारे दोन्ही एजन्सीकडून एकूण रक्कम रु.१३,६७,३६,१९२/- इतका दंड वसुल करण्यात आला आहे.

तसेच दोन्ही एजन्सींच्या कामात सुधारणा न झाल्यामुळे करारनाम्यातील अटी व शर्तींनुसार महानगरपालिकेमार्फत त्यांना दि.०१.१०.२०२४ Preliminary Termination Notice बजावण्यात आली आहे. त्याअनुषंगाने एजन्सींमार्फत Proposal to rectify सादर केल्यामुळे कामात सुधारणा करण्याकरिता नोव्हेंबर, २०२४ मध्ये एजन्सींना ९० दिवसांचा कालावधी देण्यात आला. एजन्सींच्या कामाचे मूल्यमापन करण्याची कार्यवाही नागपूर महानगरपालिकेच्या स्तरावर सुरू आहे.

यवतमाळ शहरातील अमृत योजनेतंर्गत झालेला गैरव्यवहार

(२८) * ४७८१ श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात अमृत योजनेतंर्गत पाणीपुरवठा योजनेमुळे शहरातील खराब झालेले रस्ते दुरुस्त करण्यासाठी नगरपालिकेने ९ कोटी रुपये मंजूर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगरपालिकेने सदर रस्त्यांची दुरुस्तीची कामे न करता शहराबाहेर करण्यात आलेल्या भूमिगत गटार योजनेत खराब झालेल्या रस्त्यांची कामे मंजूर करुन ९ कोटींचा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे : (१), (२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत यवतमाळ शहराच्या पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पांची कार्यान्वियन यंत्रणा ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत यवतमाळ शहराच्या पाणीपुरवठा व मलनिःस्सारण प्रकल्पांच्या कामामुळे शहरातील रस्ते दुरुस्तीबाबत दिनांक ०८ ऑगस्ट, २०२२ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत अमृत अभियानांतर्गत मंजूर पाणीपुरवठा प्रकल्पातील वितरण व्यवस्थेच्या उपांगात रस्ते दुरुस्तीकरिता PCC M-१५० Grade कॉंक्रिटचा ३८२९८ CuM परिमाणाची तरतूद असून त्याची रुपये ४३२३/- प्रति CuM नुसार किंमत रुपये १६५५.९२ लक्ष एवढी असून त्यापैकी रुपये २५० लक्ष एवढा खर्च झाला असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने बैठकीत सांगितले. त्यानंतर मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांनी रस्ता दुरुस्तीकरिता तरतुदीतील उर्वरित रक्कम नगरपरिषदेस दिल्यास नगरपरिषद रस्ते दुरुस्ती करण्यास तयार असल्याचे बैठकीत सांगितले. त्यास अनुसरून रस्ते दुरुस्तीची उर्वरित रक्कम नगरपरिषदेस वळती करण्यासाठी वरिष्ठ कार्यालयाची परवानगी घ्यावी व मंजूरीनंतर सदर रक्कम नगरपरिषदेस वळती करावी तसेच, मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांनी तोपर्यंत प्राथमिक तपासणी तसेच जागेची पाहणी करून अंदाजपत्रक तयार करून पुढील कार्यवाही नियमानुसार सुरू करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी बैठकीत दिले.

त्यास अनुसरून रस्ते दुरुस्तीकरिता योजनेत होणाऱ्या एकूण खर्चाचा विचार करून कार्यकारी अभियंता, मजीप्रा यवतमाळ यांनी मजीप्राच्या वरिष्ठ कार्यालयाच्या मान्यतेने दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या पत्रान्वये रुपये ९ कोटी निधी अमृत योजनेंतर्गत यवतमाळ शहर पाणीपुरवठा प्रकल्पातील नादुरुस्त झालेल्या रस्त्याच्या दुरुस्तीसाठीच वापरण्याच्या अटीवर यवतमाळ नगरपरिषदेस वर्ग केला आहे.

तद्नंतर, यवतमाळ नगरपरिषदेने नगरपरिषद क्षेत्रातील अमृत योजनेंतर्गत प्रकल्पाच्या कामामुळे खराब झालेल्या ४९ रस्त्यांची यादी तयार करून व ४९ रस्त्यांपैकी ४८ रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी सदर रस्त्यांच्या कामांची सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तांत्रिक मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबवून एकूण ३४ रस्त्यांची कामे नगरपरिषद मार्फत सुरू करण्यात आली असून ती प्रगतीपथावर आहेत व उर्वरित १४ रस्त्यांची फेरनिविदा प्रक्रिया सुरू केली असून निविदा प्रक्रिया झाल्यानंतर सदरील रस्ते दुरुस्ती करण्याचे यवतमाळ नगरपरिषदेचे नियोजन आहे.

शेवगांव व नेवासा (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरल्यामुळे शेतपिकांचे झालेले नुकसान

(२९) * ४८०१ श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेवगाव नेवासा (जि.अहिल्यानगर) तालुक्यातील २२ गावांमधील सुमारे ४०० ते ४५० शेतकऱ्यांच्या जायकवाडी जलायशाकरिता संपादीत न झालेल्या शेतजमिनीत बॅक वॉटरचे पाणी शिरुन दरवर्षी शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षापासून शेतकऱ्यांकडून नुकसान भरपाईची मागणी करण्यात येत असून अद्यापही त्यांना नुकसान भरपाई देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरवर्षी होणाऱ्या नुकसानीवर उपाययोजना म्हणून जायकवाडी जलाशयातील बॅक वॉटर क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या जमिनींचे जलसंपदा विभागाच्या दिनांक २१.०९.२०१२ नुसार अतिरिक्त भूसंपादन करणेबाबतची मागणी शेतकऱ्यांनी केली असून त्यावर देखील अद्याप शासनाने कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ भरपाई देणे व शेतकऱ्यांच्या जमिनींचे अतिरिक्त भूसंपादन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : (१) हे अंशत: खरे आहे, सन २०२० मध्ये शेवगांव तालुक्यातील १७ गावातील ११९ शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले आहे

(२) हे अंशत: खरे असून मुख्यत: सन २०१९-२० पासुन सतत चार वर्षे जायकवाडी धरण १००% भरल्यानंतर जायकवाडी प्रकल्प जलाशय लगतच्या जमीनीमध्ये पुराचे पाणी जावून पिक नुकसान भरपाईची व अतिरिक्त भूसंपादन करुन मोबदला देण्याची शेतकऱ्यांकडून मागणी करण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

जायकवाडी प्रकल्पाचे जलाशया लगतचे नेवासा, शेवगांव, पैठण व गंगापुर या तालुक्यातील शेतजमीनीत बॅकवॉटरचे पाणी शिरत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असल्याने अतिरिक्त भूसंपादन करणेस तत्वत: मान्यतेचा प्रस्ताव महामंडळाकडून प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासन स्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मानवत ते पाळोदी (जि.परभणी) येथील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याबाबत

(३०) * ६०३ डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत ते पाळोदी (जि.परभणी) येथील १२ किमी रस्त्याच्या कामाला निधी मिळाल्यानंतर सदर रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने मातीमिश्रीत खडी, प्रमाणापेक्षा कमी खोदकाम तसेच दबाई करतांना पाण्याचा वापर करण्यात येत नसल्याने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार या गावातील ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित अधिका-याकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ता दुरुस्तीसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) सदर रस्त्याची सुधारणा करणे करिता रक्कम रु.३७.३० कोटीची मंजूर कामे प्रगतीत आहे.
(२) होय, निवेदन प्राप्त आहे.
(३) सदरची कामे करारनाम्याच्या तरतूदीप्रमाणे कार्यान्वित करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथे मे. सुधांशु इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लिमिटेड या विकासकाने केलेला गैरव्यवहार

(३१) * २८३३ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील भांडुप (पश्चिम) येथे मे.सुधांशु इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लिमिटेड या विकासकाने अनिराज टॉवर ही आठ मजली अनधिकृत इमारत बांधली असून ३१/१३ अंतर्गत भू.मा. नं. ६१३/१ ते ३६ असा असून सदर इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील गाळेधारकांना भोगवटा प्रमाणपत्र न घेताच बेकायदेशीररित्या घराचा ताबा दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाने बांधलेली इमारत आठ मजली असून सदर मजल्यावर ८००० चौरस फूटाचा बँक्वेट हॉल सुरू करून बेकायदेशीररित्या व्यवसाय सुरू केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अनधिकृत बाधलेल्या बँक्वेट हॉल मध्ये कोणतीही अनुचित घटना घडू नये म्हणून विकासक व वास्तुविशारद यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकारणातर्फे नोटीस देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर विकासक तसेच वास्तुविशारद यांनी अनधिकृत बांधकाम सुरूच ठेवले असल्याने याबाबत शासनाने चौकशी करुन उक्त विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. एकनाथ शिंदे : (१) सदर इमारतीस १२ मजल्यापर्यंत बांधकामास परवानगी देण्यात आली आहे. तथापि, पहिल्या मजल्यावर भोगवटा प्रमाणपत्र न घेता विकासकाने गाळयांचा ताबा दिला आहे. ही बाब खरी आहे.
(२) हे खरे आहे
(३) हे खरे आहे
(४) विकासक तसेच वास्तु विशारद यांनी अनाधिकृत बांधकाम सुरु ठेवल्याने दि.२२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये त्यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली. सदर नोटीसीच्या अनुषंगाने विकासकाकडून खुलासा प्राप्त न झाल्याने विकासकाविरुध्द महाराष्ट्र नगर रचना अधिनियम-१९६६ च्या कायद्याअंतर्गत कलम ५३ अन्वये विकासकावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नाशिक महानगरपालिकेमध्ये भूसंपादनामध्ये झालेला गैरव्यवहार

(३२) * ५५ श्री.छगन भुजबळ (येवला), ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक महानगरपालिकेमध्ये सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२ या कालावधीत भूसंपादनात ८०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे शासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ज्यांनी वीस वर्षापूर्वी मोफत जागा दिली त्यांना प्राधान्याने मोबदला देण्याऐवजी उच्च न्यायालयाचा अवमान करून तत्कालीन नाशिक महानगरपालिका आयुक्त यांनी विशिष्ट विकासकाला आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या उद्देशाने ११ प्रकरणांमध्ये ५५ कोटी रुपयांचे बेकायदेशीर भूसंपादन केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भूसंपादन करायचे असल्यास अतिरिक्त आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली प्राधान्यक्रम समिती नेमून प्राधान्यक्रम ठरवून भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला वितरीत करण्याचा शासन नियम असताना समिती तसेच प्रमुख सदस्यांना डावलून सदरहू भूसंपादन केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नाशिक महानगरपालिकेत विकास आराखडा अस्तित्वात आल्यानंतर सन १९९५ पासून जवळजवळ २७१ भूसंपादन प्रकरणांमध्ये व्याज सुरू असून ही सर्व प्रकरणे नांदूर,मानूर,आडगाव,मखमलाबाद व म्हसरूळ तसेच तपोवन परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांची आहे, हे ही खरे आहे काय
(५) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १६/१२/२०१४ रोजी लेखी निवेदनाद्वारे संबंधित बेकायदेशीर भूसंपादन प्रकरणाची उच्चस्तरीय समिती मार्फत चौकशी करून तत्कालीन मनपा आयुक्त व संबधित विकासकांवर कारवाई करण्याबाबत मागणी केली आहे ,हे खरे आहे काय,
(६)असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग (नवि -२) यांना कार्यवाही करण्याबाबत आदेश दिले असता त्या अनुषंगाने संदर्भ क्र.नामपा-२०२५/vip/सं.क्र.०१/नवि-२५ दि. ०६/०१/२०२५ कार्यासन अधिकारी, नगरविकास अधिकारी यांनी आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना तपासणी करून तातडीने वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश दिले ,हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, अद्याप पर्यंत मनपा नाशिक प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.एकनाथ शिंदे : (१) प्रस्तुत प्रकरणी मा.विधानसभा सदस्य ॲड.श्री. राहुल उत्तमराव ढिकले यांचे दि.१७.१२.२०२४ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.
(२) नाही. प्रस्तुत प्रकरणी सिंहस्थ कुंभमेळा, २०१४-१५ च्या कालावधीत विकास योजना रस्त्यांचे कामासाठी, या रस्त्यांनी बाधित, खाजगी जमीनमालकांचे क्षेत्र त्यांचे संमतीने नाशिक महानगरपालिकने ताब्यात घेतले आहे. या प्रयोजनासाठीचे विविध भूसपांदन प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांचेकडे सादर करण्यात आले आहेत. सन २०२४ मध्ये सुमारे रु.५५ कोटींच्या भूसपांदन प्रस्तावांमध्ये, बहुतांश भूसंदर्भ दावे हे न्यायालयीन आदेशामधील प्रस्ताव व काही महानगरपालिकांचे आवश्यक प्रस्ताव यांचा समावेश आहे. अशा विविध भूसंपादन प्रकरणी ११ प्रस्तांवांमधील बहुतांश प्रस्तावांमध्ये भूसंपादनची प्रक्रिया पूर्वीच पूर्ण झाली होती. तद्नंतर सदर प्रस्तावात भूसंदर्भ दावे दाखल झाले होते. त्यामधील, मा. न्यायालयाच्या आदेशानुसार वाढीव मोबदल्याचा रकमा जमा करण्यात आलेल्या आहेत. तर, अत्यावश्यक प्रकरणांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार, भूसंपादन अधिनियमाचे कलम १९ नुसारची अधिसूचना निर्गमित होणेसाठी रकमा जमा करण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रस्तुत प्रकरणी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांनी गठीत केलेल्या प्राधान्यक्रम समितीने कोणताही निर्णय न घेतल्याने आयुक्त तथा प्रशासक यांनी त्यांना प्राप्त अधिकारात त्यांच्यास्तरावर निर्णय घेऊन स्थायी समितीच्या मंजूरीने ११ प्रस्तावांतील रकमा जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयात तसेच मा.जिल्हा न्यायालयात भरणा करण्यात आलेल्या आहेत.
(४) सद्यस्थितीत सुमारे २२१ भूसंपादन प्रस्ताव विविध टप्प्यावर सुरु आहेत. त्यातील ज्या प्रस्तावांमध्ये महानगरपालिकेने कलम १९ अन्वये आवश्यक असलेली रक्कम भरलेली आहे, अशाच प्रस्तावात अतिरिक्त घटकाची १२ टक्के प्रतिवर्ष रक्कम देय आहे. तसेच सदर २२१ प्रस्तावांमध्ये महानगरपालिका हददीतील सर्वच क्षेत्रातील प्रस्तावांचा समावेश आहे.
(५), (६) व (७) प्रस्तुत प्रकरणी मा. विधानसभा सदस्य श्री. राहुल ढिकले यांचे दि.१७.१२.२०२४ चे पत्रानुसार उक्त प्रकरणी शासनाने महानगरपालिका स्तरावर तपासणी करुन अहवाल सादर करणेबाबत दि.०३.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये नाशिक महानगरपालिकेस कळविलेले असून, त्यानुसार सदर प्रस्तावांची सविस्तर चौकशी करून अहवाल शासनास सादर प्राप्त करून घेऊन पुढील यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

सांगली-मिरज कुपवाडा महापालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या एकाच कामांचे देयक दोन वेगवेगळ्या लेखाशिर्षातून काढण्याचा प्रयत्न केल्याबाबत

(३३) * १९८३ श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली-मिरज कुपवाडा महापालिका क्षेत्रातील नालेसफाईच्या एकाच कामांचे १० लाख ५० हजार रुपयांचे देयके दोन वेगवेगळ्या लेखाशिर्षातून काढण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरण निदर्शनास येताच महापालिका आयुक्तांनी चौकशीचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून घनकचरा व अभिकर्ता शुल्क अदा करण्याबाबतचे देयक लेखा विभागाकडे सादर करण्यात आले होते. तथापि, सदरचे देयक महानगरपालिके करीता वाहन पुरवठा करणे यासाठी असल्याने वाहन खरेदी करणे/ भाडयाने घेणे या लेखाशिर्षामधून अदा करणे अपेक्षित असल्याने लेखाशिर्षामध्ये बदल केला, ही वस्तूस्थिती आहे. याप्रकरणी महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झालेले नसून दुबार देयक तयार करुन मक्तेदारास रक्कम अदा करण्यात आलेली नाही.
(२) व (३) याप्रकरणी आयुक्त, सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका यांनी अतिरीक्त आयुक्त (१) यांना चौकशी करण्याचे आदेश दिले असून चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गेवराई (जि.बीड) नगरपरिषदेत पाणीपुरवठा योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

(३४) * १६३४ श्री.विजयसिंह पंडित (गेवराई) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) येथील नगरपरिषदेत सन २००९ ते २०२४ या कालावधीत करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झाली असून या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या कामांच्या निविदा व कार्यारंभ आदेशातील विहित मुदतीत काम पूर्ण न करणे, एकाच कामावर वारंवार निधी खर्च करुन आर्थिक अपहार करणे, अटी व शर्तींचे उल्लंघन करणे इत्यादी अनियमितता झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेच्या कामासाठी शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होवूनही नागरिकांना पुरेसा व स्वच्छ पाणी पुरवठा होत नसल्याने याबाबतची चौकशी करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांचेकडे दिनांक १० जानेवारी,२०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, जायकवाडी धरणातून शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी केलेल्या योजनेच्या कामांची चौकशी व तांत्रिक परिक्षण उच्चस्तरीय समितीकडून करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन निकृष्ट कामांची दुरुस्ती करणे, नागरिकांना पुरेसा व स्वच्छ पाणी पुरवठा करणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) गेवराई नगरपरिषदमधील करण्यात आलेल्या नळ पाणीपुरवठा योजनेची कामे निकृष्ट दर्जाची झालेली नाहीत व या कामांमध्ये गैरव्यवहार झालेला नाही. तसेच, प्रस्तुत कामांच्या कामांचे त्रयस्थ संस्थेने तांत्रिक लेखा परीक्षण करण्यात आलेले असून त्यामध्ये सदरील कामे समाधानकारक झाले असल्याचे नमूद केलेले आहे.

(२) गेवराई नगरपरिषद क्षेत्रातील करण्यात आलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामाची विहित कार्यपद्धतीनुसार ई-निविदा राबवून गेवराई नगरपरिषद मार्फत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पाचे काम तांत्रिक कारणांमुळे, कोविड-१९ च्या महामारीमुळे पूर्ण करण्यास विलंब झाला असून सद्यस्थितीस प्रकल्पाची भौतिक प्रगती ९० % झालेली असून उर्वरित काम पुढील तीन महिन्यात पूर्ण करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे. तसेच, सन २००९ ते २०२४ दरम्यान पाणीपुरवठ्याशी झालेल्या कामांमध्ये द्विरुक्ती झालेली नाही तसेच, एकाच कामावर वारंवार निधी खर्च करण्यात आलेला नसल्याचे मुख्याधिकारी, गेवराई नगरपरिषद यांनी कळविले आहे.

(३), (४), (५) व (६) सन्माननीय लोकप्रतिनिधींनी दिनांक १० जानेवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये गेवराई शहरातील पाणीपुरवठा प्रकल्पास कोट्यवधी रुपयांचा निधी प्राप्त होऊनही नागरिकांना नियमित पाणी मिळत नसल्याबाबत तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे केलेली आहे.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडून कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, बीड यांना पत्रात नमूद बाबींच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

कल्याण डोंबिवली महानगपालिकेच्या हद्दीतील ५८ अनधिकृत इमारतीबाबत

(३५) * १०७४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीतील ५८ महारेरा अनधिकृत इमारत प्रकरणातील सात इमारतींमधील रहिवाशांनी आपल्या वास्तुविशारदामार्फत पालिकेच्या नगररचना विभागात इमारत नियमानुकूलसाठी लेखी प्रस्ताव माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामधील सुमारे ३३ इमारती आरक्षित भूखंड, हरितपट्टे, खासगी जमिनींवर पालिकेच्या परवानग्या न घेता, इमारत बांधणीचे सर्व नियम दुर्लक्षित करून उभारण्यात आल्याचे पालिकेने केलेल्या सर्वेक्षणात दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या मध्यमवर्गीय गरजू लोकांनी सदर इमारतीत बँकेचे कर्ज काढून सदनिका विकत घेतल्या असून त्या अनधिकृत ठरल्यामुळे त्यांची फसवणूक होवून त्यांचेवर विस्थापित होण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकरणाची शासनाने चौकशी करुन फसवणूक झालेल्या रहिवाशांना न्याय देणेबाबत तसेच दोषी विकासक व अनधिकृत बांधकाम प्रकरणी दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीत रेरा अंतर्गत दाखल गुन्ह्यातील ६५ अनधिकृत बांधकामांपैकी महानगरपालिकेकडे बांधकाम नियमानुकूल करणेकामी एकूण ३८ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदरचे ३८ प्रस्ताव हे एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० (UDCPR) तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम ४४ शी सुसंगत नसल्याने महानगरपालिकेमार्फत फेटाळण्यात आलेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) बांधकाम नियमानुकूल करणेकरीता सादर करण्यात आलेल्या प्रस्तावातील कागदपत्रांचे अवलोकन केले असता, सर्वसाधारणत: २२ इमारती रहिवास विभागात समाविष्ट असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी या विभागामार्फत नियोजन प्राधिकरणांच्या हद्दीतील खाजगी जमिनीवरील अनधिकृत बांधकामांना प्रतिबंध आणि तात्काळ कारवाई करण्यासंदर्भात दि.२५.०२.२०२५ अन्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यात फसवणूक झालेल्या रहिवाशांना न्याय देण्याच्या अनुषंगाने उचित तरतूदी करण्यात आल्या आहेत.

सदर प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने बनावट कागदपत्रे तयार करून, बांधकाम परवाना मिळविणाऱ्या विकासकावर गुन्हे दाखल केलेले आहेत. तसेच, याबाबत एसआयटी मार्फत तपास सुरू असून, तपासाअंती दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याबाबत

(३६) * १४१२ श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चारगाव-कळमणा (ता.वणी, जि.यवतमाळ) ते चंद्रपूर जिल्हा बॉर्डर (वनोजा) रस्त्याची सुधारणा करणे, व रा.मा. ३१७, कि.मी. १८२/१०० ते २०४/५०० या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने संपूर्ण रस्त्यांची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामाच्या करारातील हमी कालावधीच्या अगोदरच या रस्त्याची दुरवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन संबंधित ठेकेदार कंपनीवर नुकसान भरपाईच्या कार्यवाहीसह काळया यादीत समाविष्ट करण्याची मागणी स्थानिक लोकप्रिनिधींनी प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) व (२) सदर रस्त्यावर कार्यान्वयीत केलेल्या कामातील काही लांबीतील काम क्षतिग्रस्त झाले होते. सदर लांबीतील दुरुस्तीची कामे करारनाम्याच्या तरतुदीप्रमाणे कंत्राटदारामार्फत दुरुस्त करुन घेण्यात आली आहेत. सद्य:स्थितीत रस्ता वाहतुकीकरिता सुस्थितीत आहे.
(३) होय, निवेदन प्राप्त आहे.
(४) सदर कामाची चौकशी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, अमरावती यांचेमार्फत आदेशित करण्यात आली आहे. अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड (जि.बीड) नगरपरिषदेमधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजना व इतर कामांमध्ये झालेला गैरव्यवहार

(३७) * २३८२ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड (जि.बीड) नगर परिषद मधील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजना व इतर कामामध्ये गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी उच्चस्तरीय चौकशी करावी व चौकशी होईपर्यंत देयके अदा करू नयेत, याबाबत तक्रार करुन श्री.नितीन मुजमुले यांनी दि. २६ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) बीड नगरपरिषदेअंतर्गत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती योजनेअंतर्गत बीड येथील प्रभाग क्र.०२ मधील शिवशारदा बिल्डिंग (जालना रोड) ते जिजामाता चौकपर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता करणे, चंपावती हार्डवेअर ते जालनेकर ट्रेडर्स पर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता करणे आणि संत सावतामाळी चौक ते अमरधाम स्मशानभूमी पर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता करणे या कामाची विहित निविदा प्रक्रिया राबवून श्री समर्थ कन्स्ट्रक्शन, बीड यांची निविदा मंजूर करुन त्यांना दि.३०.०९.२०२४ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर योजनेचे काम पूर्ण झाले आहे.

सदर योजनेतील पूर्ण झालेल्या कामांचे शासकीय तंत्रनिकेतन, बीड यांच्यामार्फत दि.१४.०२.२०२५ रोजी त्रयस्त तांत्रिक लेखापरिक्षण करण्यात आले असून, त्यांच्या अहवालानुसार सदरचे काम तांत्रिकदृष्ट्या समाधानकारक आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राजूरा (जि. चंद्रपूर) येथे वर्धा नदीवर बांधण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामात झालेला गैरव्यवहार

(३८) * ४८२६ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा): सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील राजूरा (जि. चंद्रपूर) जवळील वर्धा नदीवर सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कोटयवधी रुपये खर्च करुन जीआर इन्फ्रा कंपनीमार्फत सुरु करण्यात आलेल्या पुलाच्या बांधकामात निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट बांधकामामुळे काही दिवसातच सदर पुलाच्या खांबाचा भाग कोसळून अनेक कामगार जखमी झाल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभाग व कंपनीच्या वतीने कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कोणतीच उपाययोजना करण्यात आली नव्हती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जखमींना आर्थिक मदत देणेबाबत तसेच दोषी कंत्राटदार कंपनी व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही,

चंद्रपूर-वीसापूर-बल्लारपूर-बामणी-राजूरा-देवाडा-लक्कडकोट-महाराष्ट्र राज्य सिमेपर्यंत राष्ट्रीय महामार्ग क्र.९३०D हा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचेकडे असून सदर ३२.९८५ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे व वर्धा नदीवरील पुलाचे काम दि. २७.०५.२०२२ च्या करारा अन्वये प्रगतीत आहे.

(२) हे खरे नाही,

दिनांक २४.११.२०२४ रोजी पुलाच्या खांबाचे कॅपचे कॉक्रीटीकरणाचे काम चालू असताना कॉक्रीट भरलेल्या ट्रकने उक्त खांबाच्या कॅपचे कॉक्रीटीकरणासाठी उभारण्यात आलेल्या तात्पुरत्या स्वरूपाचे (Supporting Structure) शटरींगला अनावधानाने धडकून अपघात झाला. त्यामुळे सदर शटरींगचा काही भाग नुकत्याच केलेल्या काँक्रीटसह खाली पडला व दोन मजुरांना किरकोळ जखम झाली.

(३) व (४) रस्त्याच्या कामावर काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कंपनीच्या वतीने सुरक्षा उपकरणे मजुरांना देण्यात येतात. तसेच वेळोवेळी मजुरांचे सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येतात.

सदर अपघातातील जखमी मजुरांना लगेच दवाखान्यामध्ये नेण्यात येऊन उपचार करण्यात आले. जखमी मजुरांच्या उपचारांचा पूर्ण खर्च ठेकेदार मे.जी.आर. इन्फ्रा कंपनीद्वारे करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

धाराशिव नगरपरिषदेतील मुख्याधिकारी यांनी केलेल्या गैरव्यवहार

(३९) * २२४७ श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपरिषदेतर्गत विविध गैरव्यवहाराप्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी श्रीमती वसुधा फड यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात यावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पत्र दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्रावर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रधान सचिव, नवी-२ यांना उद्देशून त्यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करावी असे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्यामार्फत शासनाकडे पाठविलेल्या खुलाशाद्वारे हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) व (२) हे खरे आहे.

सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधी यांच्या दि.१९.१२.२०२३ रोजीच्या निवेदनावर तत्कालीन मा.मुख्यमंत्री महोदयांनी कार्यवाही करावी, असे आदेश देण्यात आले आहेत.

(३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी दि.०५.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये विभागास सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, धाराशिव यांना स्वतंत्र तपासणी करुन अहवाल सादर करण्याबाबत, तसेच पोलीस विभागास तातडीने आवश्यक व सुस्पष्ट दस्तावेज उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याबाबत दि.२०.०६.२०२४ कळविण्यात आले.

(४) मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांच्या दि.१३.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव यांना सदर प्रकरणी तपासकामी आवश्यक व सुस्पष्ट दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तथापि, जिल्हाधिकारी, धाराशिव यांचा स्वतंत्र तपासणी अहवाल प्रलंबित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे नवघर मीरा भाईंदर महापालिकेतील कनाकिया परिसरात विकासकाने रुग्णालयाचे बांधकाम न केल्याबाबत

(४०) * ९५९ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे नवघर मीरा भाईंदर महापालिकेतील कनाकिया परिसरात आरक्षण क्रमांक ३०२ वर अतुल शहा या बांधकाम विकासकास ४०% जागेवर रुग्णालयाचे बांधकाम केल्यानंतर ६०% जागेत रहिवास व वाणिज्य बांधकाम परवानगी दिलेली असताना विकासकाने रुग्णालयाचे बांधकाम न करता रहिवास क्षेत्राचे बांधकाम सुरू करुन विक्री केल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी करुन बांधकाम विकासक अतुल शहा यांनी कराराप्रमाणे रुग्णालयाचे बांधकाम न करता स्वतःच्या हिताचे रहिवास क्षेत्राचे बांधकाम करून सदनिकांची विक्री केल्याने त्याच्यावर कोणती कारवाई केली अथवा करारनाम्याचे उल्लंघन केल्याने त्याचा करार रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) व (२) मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे नवघर येथील आरक्षण क्र.३०२ (म्युनिसिपल हॉस्पिटल) या आरक्षणाच्या समावेशक माध्यमातून विकास करणेकरिता स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेकरीता महानगरपालिकेने विकासकास दि.०६.१०.२०२२ रोजी संमतीपत्र/इरादापत्र दिलेले आहे.

- सदर इरादापत्राच्या अनुषंगाने समावेशक आरक्षणाच्या तरतूदीनुसार महानगरपालिकेस ४०% भूखंड क्षेत्रावर हॉस्पिटल बांधून हस्तांतरीत करावयाच्या हॉस्पिटलच्या बांधकामाकरीता दि.०७.१०.२०२२ रोजी विकास परवानगी दिलेली आहे.
- तर इरादापत्रानुसारच विकासकास प्राप्त होणाऱ्या ६०% भूखंड क्षेत्रासह त्यांच्या मालकीच्या आरक्षणाच्या लगत असलेल्या रहिवास वापराच्या भूखंडावर रहिवास व वाणिज्य वापरासाठी दि.१७.०४.२०२३ रोजी सुधारित विकास परवानगी दिलेली आहे.
- विकासकाने उक्त दि.०७.१०.२०२२ च्या विकास परवानगीमधील अटी व शर्तींची पूर्तता न केल्याने दि.१७.०४.२०२३ अन्वये दिलेल्या परवानगीस महानगरपालिकेने दि.२१.०६.२०२३ रोजी स्थगिती दिली होती.
- विकासकाने उपरोक्त दोन्ही विकास परवानगीनुसार बांधकाम सुरू केलेले नव्हते. तथापि, महानगरपालिकेने दिलेल्या बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने विकासक यांच्या रहिवास व वाणिज्य इमारतीमधील सदनिका, खरेदी करारनामे, सह दुय्यम निबंधक कार्यालयात नोंद झाले असल्याचे निदर्शनास आले आहे.
- महानगरपालिकेने दिलेल्या स्थगिती आदेशाविरूध्द विकासकाने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती. परंतु विकासकाने सदरची याचिका मागे घेतल्याने, मा. उच्च न्यायालयाने दि.१९.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये याचिका निकाली काढली.
- तद्नतर विकासकाने परवानगीतील अटी व शर्तींची पूर्तता करण्याच्या अधीन राहून स्थगिती उठविण्याची विनंती महानगरपालिकेस केली असता, महानगरपालिकेने ठराव क्र. ३६८, दि.०२.०१.२०२५ पारीत करून, सदर ठरावाच्या अनुषंगाने दि.०८.०१.२०२५ रोजी स्थगिती आदेश रद्द केले. त्यानंतर विकासकाने जागेवर खोदाईचे काम सुरू केले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कळवंडे, (ता.चिपळूण, जि रत्नागिरी) येथील धरणाच्या
दुरूस्तीचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(४१) * १९४ श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कळवंडे (ता.चिपळूण जि.रत्नागिरी) येथील धरणाच्या दुरस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे धरणाला धोका निर्माण झाल्याचे माहे जुलै,२०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरणाच्या दुरूस्तीचे काम अनुभव नसलेल्या ठेकेदारांच्या नावाखाली संबंधित अधिकारीच करत असल्याची बाब स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनास दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आणून दिली असता जलसंपदा मंत्री यांनी प्रकरणाची विशेष दक्षता पथकांची नेमणूक करुन चौकशी करण्याचे आदेश दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशी पूर्ण करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. गिरीश महाजन : (१) अंशत: खरे आहे.

कळवंडे धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एप्रिल-जून, २०२३ मध्ये धरणाच्या गळती प्रतिबंधक उपाययोजनेचे काम निविदेतील विनिर्दिष्टांनुसार करण्यात आले आहे.

तथापि दिनांक २८/०६/२०२३ रोजी नवीन केलेल्या कामातील काही भाग घसरल्याचे निदर्शनास आले.

(२)अंशत: खरे आहे.

सदर धरणाच्या दुरुस्तीचे काम अनुभव नसलेल्या ठेकेदारांच्या नावाखाली संबधित अधिकारीच करत असल्याची बाब खरी नाही.

सदर धरणाच्या दुरुस्ती कामाच्या निविदेची कार्यवाही शासनाच्या प्रचलित नियमानुसारच करण्यात आली असून स्पर्धेअंती काम मिळालेल्या ठेकेदाराकडूनच काम प्रगतीत होते.

सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनामध्ये लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेच्या अनुषंगाने सदर कामाच्या चौकशीचे आदेश कोकण पाटबंधारे महामंडळाने अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परीमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे यांना दिले आहेत.

(३) शासनाने सदर चौकशी अहवालाबाबत काही बाबींची पुर्तता करणेबाबत दक्षता पथक व महामंडळास कळविले असून त्याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

बीड नगरपालिकेत विविध लेखाशीर्ष तथा नगरपालिका फंडातून
विविध विकास कामात झालेला गैरव्यवहार

(४२) * ३९०१ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड नगरपालिकेत विविध लेखाशीर्ष तथा नगरपालिका फंडातून विविध विकास कामाला प्रशासकीय मान्यता सन २०२२ ते २०२५ या दरम्यान मिळालेली असून या कालावधीमध्ये मुख्याधिकारी, नगरपरिषद, बीड यांनी शासन निर्णयाचा अवलंब न करता शासन, जिल्हा स्तरावरील तथा नगरपरिषद फंडांतर्गत होत असलेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२ ते जानेवारी २०२५ या कालावधीमध्ये झालेल्या कामांची त्रयस्थ समिती अथवा गुण नियंत्रण विभागाकडून चौकशी व्हावी व न.प फंडाअंतर्गत प्रस्तावित तसेच मंजूर करण्यात आलेल्या व कार्यारंभ आदेश झालेल्या सर्व विकासात्मक कामांची चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्याधिकारी व संबंधित अधिकारी यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही,

जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार बीड नगरपरिषद क्षेत्रात विविध लेखाशिर्षांतर्गत करण्यात येणाऱ्या विविध विकास कामांकरीता शासकीय नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार विहित निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून तद्नंतर कामाचे कार्यारंभ आदेश देऊन काम पूर्ण करण्यात येते. नगर विकास विभाग, शासन निर्णय दि.२८.०३.२०१८ नुसार त्रयस्थ तांत्रिक लेखापरीक्षण करून अहवाल समाधानकारक आल्यानंतरच अंतिम देयके अदा करण्यात आली आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी यांच्या अहवालानुसार बीड नगरपरिषदेत विविध लेखाशीर्ष तथा नगरपालिका फंडातून होत असलेल्या कामामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार किवा अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांच्या दि.१५.०२.२०२५ च्या पत्रान्वये यासंदर्भात मागणी करण्यात आली आहे.

(३) मा.लोकप्रतिनिधी यांच्या दि.१५.०२.२०२५ रोजीच्या तक्रारीच्या अनुषंगाने नियमोचित कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याबाबत दि.०७.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पोयसरसह दहिसर व वालभट नदींच्या पुनरुज्जीवनासाठीचा प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

(४३) * ३८३२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील नदींमधील प्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने पोयसर नदीसह दहिसर, वालभट या तीन नदींच्या पात्रात १० मलजल प्रक्रिया केंद्रे उभारणी व पुनरुज्जीवनासाठी तब्बल १४८२ कोटी रुपयांच्या प्रकल्पांची सन २०१९ मध्ये निविदा काढून कंत्राटदाराची नियुक्ती करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा काढल्यानंतर तब्बल दोन वर्षानंतर प्रकल्पाला ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामी कंत्राटदारास तब्बल १३ वेळा मुदतवाढ देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाला इतक्या विलंबाने ना-हरकत प्रमाणपत्र तसेच कंत्राटदाराला वेळोवेळी मुदतवाढ दिल्यामुळे नदीतील प्रदूषणात वाढ झाली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करुन सदर प्रकल्प तातडीने पूर्ण करुन विलंबास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे अंशत: खरे आहे,

पोयसर नदी पात्रात रू.१४८२.३९ कोटी इतक्या प्रकल्प किंमतीच्या १०, दहिसर नदी पात्रात रू.३७६.०५ कोटी इतक्या प्रकल्प किंमतीच्या २ व वालभट नदी पात्रात रू.९७५.०३ कोटी इतक्या प्रकल्प किंमतीच्या ५ अशा एकूण १७ मलजल प्रक्रिया केंद्राकरीता दि.२१.०४.२०२० रोजी निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. कोव्हिड कालावधी असल्याने तसेच ई-निविदा प्रक्रियेस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने निविदांना १३ वेळा मुदतवाढ देवून कार्यादेश देण्यात आले.

(२) एकूण १७ मलजल प्रक्रिया केंद्रापैकी ४ प्रकल्पांना वन विभाग, केंद्रीय आयुध निर्माण विभाग, कोस्टल रेग्युलेशन झोन व आरे प्राधिकरण यांची ना-हरकत घेण्याची आवश्यकता होती. त्यापैकी ३ मलजल प्रकल्पांना कार्यादेश दिल्यानंतर दोन वर्षांनी ना-हरकत प्राप्त झाली.

(३) हे खरे नाही,

पोयसर, दहिसर व वालभट नदी पात्रातील मलजल प्रक्रिया केंद्राकरीताच्या निविदेस कोव्हिड कालावधी असल्याने तसेच ई-निविदा प्रक्रियेस प्रतिसाद प्राप्त न झाल्याने १३ वेळा मुदतवाढ देण्यात आली.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

भिवंडी (जि. ठाणे) तालुक्यात बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

(४४) * १९१७ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील बांधकाम विभागाकडून करण्यात आलेल्या पुलाचे बांधकाम, रस्त्याचे काँक्रीटीकरण अशी अनेक कामे निकृष्ट दर्जाची झाली असून यात कंत्राटदार, अभियंता व अधिकारी/कर्मचारी यांचे संगनमताने गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा-भिवंडी रस्त्यावरील कामोठी नदीवर मोठया पुलाचे बांधकाम, तुळशी कारंजोटी रस्त्यावरील पुलाचे बांधकाम, भिवंडी भिणार वडपे रस्त्यावर कि.मी. ५३/८०० ते ५७/००० मधील रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे तसेच भिवंडी पारोळा रस्ता कि.मी ७/०० मध्ये पुलाचे बांधकाम करणे ही सर्व कामे कंत्राटदाराकडून निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी केलेल्या कामांची वरीष्ठ स्तरावरून चौकशी करुन संबंधित कंत्राटदार, अभियंता व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर केलेल्या कारवाईचा अहवाल पाठविण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक कोकण विभाग तसेच अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक १७ जुलै, २०२४ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर कामांतील संबंधित दोषी कंत्राटदार, अभियंता व अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही.
(२) सदरची कामे करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे कार्यान्वयीत करण्यात आली आहेत.
(३) व (४) सदर कामाबाबत दि. १७ जुलै, २०२४ चे प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, कोकण यांचेकडून अहवाल मागविण्यात आला आहे. अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील "ह" प्रभागाच्या अंतर्गत होत असलेल्या अनधिकृत इमारतीच्या बांधकामाबाबत

(४५) * ६३१२ श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीतील "ह" प्रभागाच्या अंतर्गत कोपर येथील चारु बामा शाळेच्या मागील भागात कृष्णा टॉवरजवळ वनराई तोडून त्या जागेवर भूमाफियांनी ७ माळयाची बेकायदा इमारत बांधल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याच प्रभागातील जुन्या डोंबिवलीत प्रकाश गोठे व शंकर ठाकुर यांच्या फशी हाईट्स व गटारावर बांधलेली बेकायदा इमारत, ठाकूरवाडीत शाळेच्या आरक्षणावरील शिवलिला इमारत, राहुलनगरमध्ये रकामांत आर्किड, सुदाम रेसिडन्सी, कुंभारपाडा खंडोबा मंदिरासमोरील अनधिकृत इमारतीच्या बांधकामाला "ह" प्रभागाचे सहाय्यक आयुक्तांनी भुमाफियांना आर्थिक हितसंबंधातून संरक्षण दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी भूमाफियांना पाठिशी घालणाऱ्या व त्यांना संरक्षण देणाऱ्या सहाय्यक आयुक्त (ह प्रभाग) यांच्यावर कारवाई करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे तक्रारी करुनही याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करणेसह जबाबदार विकासक व संबंधित अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 'ह' प्रभाग क्षेत्रामध्ये चारूबामा शाळेच्या मागे, कृष्णाई बिल्डींगजवळ संपूर्ण रहिवास इमारत आढळून आली आहे, वस्तुस्थिती आहे.
(२) फशी हाईटस इमारत, शिवलिला इमारत, सुदाम रेसिडेन्सी-१ इमारत या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळून आल्यानंतर, संबंधित बांधकामधारकास अधिकृततेबाबत कागदपत्रे सादर करण्याचे कळविले होते. परंतु, बांधकामधारकाने कोणताही प्रतिसाद न दिल्याने, संबंधितांवर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

रमाकांत आर्किड इमारत या ठिकाणी अनधिकृत बांधकाम आढळून आल्यानंतर सदर इमारतीस अनधिकृत घोषित करण्यात आले आहे.

तसेच, कुंभारखानपाडा, खंडोबा मंदिर समोरील इमारत ही महानगरपालिकेची अधिकृत परवानगी घेऊन बांधण्यात आलेली आहे.

(३) व (४) अशा आशयाचे निवेदन लोकप्रतिनिधी व नागरिकाकडून प्राप्त झाले, ही वस्तुस्थिती आहे.

प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने तपासणी करून नियमोचित कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

नागपूर सुधार प्रन्यासातील भूखंड लिलावात झालेला गैरव्यवहार

(४६) * ७२६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य) , डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा चिखली देवस्थान (जि.नागपूर) येथील पूर्व औद्योगिक क्षेत्र रस्ते योजना मंजूर करून राज्य शासनाने औद्योगिक उद्दिष्टाच्या नावाखाली दिनांक ३ मार्च, १९६७ रोजी जमिनी संपादन केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेतील प्लॉट क्रमांक ३८६ (लॉजिंगसाठी), ३८५ (रेस्टॉरंटसाठी) आणि ३८४ (व्यावसायिक वापरासाठी) दिनांक २४ मार्च, २०२२ रोजी वा त्यासुमारास लिलाव केले गेले असून या तीन वेगवेगळ्या उपयोगासाठी असलेल्या भूखंडांचे एकत्र वाटप करिया फुड्स अँड स्नॅक्स प्रा. लि. या कंपनीला करण्यात आले आहे. हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यासने उक्त प्लॉटसाठी वाटप पत्र दिले असून सदर भूखंडांसाठी समान उपयोगाच्या अटीवर भाडेपट्टा करार (लीज डीड) करणे आवश्यक असतानाही नियमांच्या विरुध्द लीजधारकाला फायदा होईल अशा पध्दतीने तीन भूखंडाचे व्यावसायिक वापरासाठी भाडेपट्टा करार (लीज डीड) करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भाडेपट्टा करारानंतर ९०% निवासी आणि १०% व्यावसायिक अशा प्रकारच्या बांधकाम आराखड्याला मंजुरी दिल्याने तीन भूखंडांचे लिलाव एकत्रितपणे निवासी आणि व्यावसायिक वापरासाठी करण्यात आले नसल्याने संबंधित कंपनीला फायदा तर नागपूर सुधार प्रन्यासला आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी राज्य तक्रार निवारण कक्षाकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या असून भूखंड वाटपात झालेला गैरव्यवहारामुळे भूखंडांचे वाटप रद्द करणे, बांधकाम आराखडा रद्द करणेबाबत तसेच तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे अंशतः खरे आहे.

नागपूर सुधार प्रन्यासद्वारे मौजा चिखली देवस्थानसह मौजा पारडी क्षेत्राकरीता पूर्व औद्योगिक क्षेत्र रस्ते योजना दि.०३ मार्च, १९६७ रोजी मंजूर करण्यात आली. तथापि, सदर योजनेकरीता दि.०६ मे, १९६८ ते १२ मे, १९८१ या कालावधीदरम्यान टप्याटप्याने जमीनी संपादीत करण्यात आल्या.

(२) हे अंशतः खरे आहे.

नागपूर सुधार प्रन्यासद्वारे सदर योजनेतील भूखंड क्र.३८४ (वाणिज्यीक वापरासाठी), भूखंड क्र.३८५ (रेस्टॉरन्ट/हॉटेल वापरासाठी), भूखंड क्र.३८६ (रेस्टॉरन्ट/फुडकोर्ट/लॉजिंग/बोडींग वापरासाठी) या भूखंडांचा दि.२५ मार्च, २०२२ रोजी ई-लिलाव (E-Auction) करण्यात आला. नागपूर सुधार प्रन्यास विश्वस्त मंडळाच्या दि. २६ नोव्हेंबर २०१९ रोजीच्या ठरावानुसार सभापती, नागपूर सुधार प्रन्यास यांना जाहीर लिलावामध्ये प्राप्त झालेल्या महत्तम बोलीस मंजुरीचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार या तीन भूखंडांचे स्वतंत्रपणे वाटप लिलावात महत्तम बोली लावणाऱ्या मे. कारिया फुड्स अँड स्नॅक्स प्रा.लि. या कंपनीला दि.२३ सप्टेंबर, २०२२ रोजी करण्यात आले आहे.

(३) हे खरे नाही.

सन २००१ च्या विकास आराखड्यानुसार या अटीवर भूखंडावर वाणिज्य वापर अनुज्ञेय असल्याने त्याप्रमाणे तीन भूखंडांसाठी दि.२७ ऑक्टोबर, २०२२ पासून ३० वर्षांसाठी भाडेपट्टा करार करण्यात आला.

(४) हे खरे नाही, एकत्रित बांधकाम विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० (UDCPR) मधील तरतुदीनुसार वाणिज्यिक भूखंडांवर निवासी वापर अनुज्ञेय आहे. भूखंडधारकांच्या अर्जानुसार सदर तिन्ही भुखंडाचे एकत्रिकरणास दि.०१ ऑगस्ट २०२३ रोजी मंजूरी देऊन दि २ फेब्रुवारी, २०२४ रोजी ६१.५६% निवासी आणि ३८.४४% वाणीज्य वापरासाठी दि.०२ फेब्रुवारी, २०२४ रोजी आवश्यक शुल्कांचा भरणा करून घेऊन इमारत परवानगी देण्यात आली. यामध्ये नागपूर सुधार प्रन्यासचे कोणतेही आर्थिक नुकसान झाले नाही.

(५) राज्य तकार निवारण कक्षाकडे यासंदर्भात तक्रारी दाखल करण्यात आल्याबाबतची माहीती नागपूर सुधार प्रन्यासकडे उपलब्ध नाही. तथापि श्री. रमेशकुमार जेजानी व इतर यांनी भूखंड क्र. ३८५ व ३८६ चा लिलाव रद्द करण्याकरीता केलेल्या तक्रारीबाबत दि. २४ मे, २०२४ रोजीच्या पत्रान्वये नागपूर सुधार प्रन्यासने सदर भूखंडांचा लिलावाच्या सर्व अटी शर्तीची पूर्तता करून दोन वर्षांपूर्वी लिलाव करण्यात आल्याने भूखंडांचे वाटप रद्द करणे शक्य नाही असे

कळविण्यात आले आहे. याशिवाय आर्थिक गुन्हे शाखेकडून नागपूर सुधार प्रन्यासला प्राप्त पत्र दि.२५ फेब्रुवारी, २०२५ अन्वये प्राप्त माहितीनुसार श्री. अंजया अनपर्थी यांनी याबाबत तक्रार केली आहे. त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही नागपूर सुधार प्रन्यास स्तरावर करण्यात येत आहे.

अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील अण्णा भाऊ साठे नागरी दलितवस्ती योजनेंतर्गत प्राप्त झालेला निधीत झालेला गैरव्यवहार

(४७) * ४८३३ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) नगरपरिषदेला अण्णा भाऊ साठे नागरी दलितवस्ती योजनेंतर्गत मंजूर विकास कामांसाठी प्राप्त झालेला ४७ कोटी ४८ लाख रूपयांचा निधी अन्य कामांसाठी वापरुन मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निधी प्रस्तावित मंजूर कामावर खर्च न करता अन्य ठिकाणी केल्याप्रकरणी तक्रार विभागीय आयुक्त, अमरावती, जिल्हाधिकारी यांच्याकडे प्राप्त असूनही अद्यापही या प्रकरणी चौकशी करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २००९-२०१० ते २०१८-२०१९ या कालावधीतील रु.४७.२० कोटी इतकी विविध योजनांतर्गत प्राप्त अनुदानाची रक्कम दुसऱ्या प्रयोजनासाठी वळती केल्याबाबत स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालयाने केलेल्या लेखापरीक्षणामध्ये दि.०१.०७.२०२२ रोजीच्या पत्रान्वये आक्षेप उपस्थित केले होते.

(२) व (३) सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन शासनास अहवाल सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, अमरावती यांना दि.२८.०२.२०२५ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

धाराशिव नगरपरिषदेतील घनकचरा व्यवस्थापनांतर्गत स्थापत्य कामाच्या निविदा प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

(४८) * २२४८ श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धाराशिव नगरपरिषदेतील घनकचरा व्यवस्थापनांतर्गत करण्यात आलेली स्थापत्य कामे निकृष्ट दर्जाची करण्यात आली असून ९५ टक्के कामांची बोगस देयके उचलून मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामांची निविदा प्रक्रिया आणि निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करुन संबधितांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने तात्काळ तपासून सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, धाराशिव यांना आदेशीत करुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी कंत्राटदार व अधिकारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी मा.लोकप्रतिनिधींचे दि.२६ फेब्रुवारी, २०२४ रोजीचे पत्र जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या कार्यालयास प्राप्त झाले आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी दि.२२ फेब्रुवारी, २०२४ च्या आदेशान्वये मुख्याधिकारी, नळदुर्ग नगरपरिषद, ता.तुळजापूर जि.धाराशिव यांचे आदेशान्वये चौकशी समिती गठीत केली. या समितीचा अहवाल दि.२७ मे, २०२४ अन्वये जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला.

तथापि, संबंधित कंत्राटदार यांनी दि.०३ जुलै, २०२४ रोजी केलेल्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी धाराशिव यांनी दि.१५ जुलै, २०२४ व दि.०२ डिसेंबर, २०२४ अन्वये चौकशी समितीस कंत्राटदार यांचे समक्ष कामाची स्थळपाहणी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविले.

त्यानुषंगाने चौकशी अधिकारी यांनी सदर प्रकल्पामध्ये पाणी व ओला कचरा साचला असल्याने सदर ठिकाणी मोजमापाची फेरपडताळणी करणे शक्य नसल्याचा अहवाल दि.०७ जानेवारी, २०२५ अन्वये जिल्हाधिकारी धाराधिव यांना सादर केला.

जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी पुनश्च दि.२७ फेब्रुवारी, २०२५ अन्वये चौकशी समितीस चौकशी पूर्ण करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्ह्यामध्ये झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत

(४९) * ४५१० श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात लेखाशीर्ष २५१५, अल्पसंख्याक, तांडा सुधार योजना, डोंगरी विकास, आरोग्य विभाग, एएमसी (२०५९, २२१६), एमडब्ल्युओ, डिपॉझिट वर्क, जिल्हा वार्षिक योजना इ. विविध लेखाशीर्षांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०१९ ते २०२५ या कालावधीकरिता इलेक्ट्रीक, बीड, ज्योतिबा इले. बीड, सावंत इलेक्ट्रीक बीड, मे.वैष्णवी इलेक्ट्रीकल्स सर्व्हीसेस, मे.समर्थ इलेक्ट्रीकल्स व जनरल सप्लायर्स औद्योगिक वसाहत संस्था, बीड अशा एकूण १२ कंत्राटदारांना विविध ठिकाणी दिलेल्या कामांपैकी काही कालावधीची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रारी प्राप्त असूनही त्या प्रकरणी कारवाई न करता सदर कामांची संपुर्ण देयके अदा करुन कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निकृष्ट कामे व अनियमिततेची त्रयस्थ समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी नागरीकांनी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोंबर, २०२३ मध्ये अप्पर मुख्य सचिव, मुख्य सचिव, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे करुनही अद्याप या प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही.

तथापि, काही प्रकरणी किरकोळ त्रुटी आढळून आल्या आहेत.

(२) हे खरे नाही

(३) व (४) होय, हे खरे आहे.

अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण विद्युत मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून चौकशी करण्यात आली आहे.त्यांनी रँडम (Random Selection) पध्दतीने ६४ विद्युत कामांची प्रत्यक्ष जागेवर पडताळणी केली असता, निर्देशनास आलेल्या किरकोळ त्रुटींची पूर्तता उप अभियंता व कंत्राटदारांकडून करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबई-नाशिक महामार्गावरील कसारा घाटात ठेकेदाराने केलेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत

(५०) * ५२५८ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई नाशिक द्रुतगती महामार्गाची दुरवस्था झाली असून या महामार्गाच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोटयवधी रुपये मंजूर करुनही कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाचे काम केल्यामुळे पहिल्या पावसातच रस्त्यावर खड्डे पडणे,संरक्षक जाळया तुटणे, कसारा घाटात दरड माती रस्त्यावर येणे,वळणावरील संरक्षक कठडे तुटल्याने सदर महामार्गाच्या दुरुस्तीच्या कामात अधिकारी व कंत्राटदार यांनी संगनमत करुन कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या कसारा घाटातील साईबाबा खींड, आंबा पॉइंट, हिवाळा ब्रीज वळण, नवीन घाटातील बीबलवाडी वळण, ब्रेक फेल पॉइंट, धबधबा पॉइंट, लतीफ वाडी उतार इत्यादी ठिकाणाचे प्रथम टप्प्यात काम निकृष्ट दर्जाचे केल्याने पुन्हा सदर काम दुरुस्ती करण्यासाठी नव्याने निधी मंजूर करुन करण्यात आलेले काम ही निकृष्ट दर्जाचे झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कसारा घाटातील महामार्गाच्या प्रथम बांधकामासाठी व त्यानंतर दुरुस्ती कामासाठी एकूण किती रुपये निधी शासनाने मंजूर केला तसेच सदर रस्त्याचे निकृष्ट काम करणारे ठेकेदार व संबंधित दोषीं अधिकारी यांच्यावर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही.

मुंबई-नाशिक द्रुतगती महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत वडापे ते गोंदे या भागातील काम बांधा, वापरा, आणि हस्तांतरण (BOT) या तत्त्वावर करण्यात येत आहे. पावसाळ्यानंतर कि.मी. ४४०/०० ते ४९३/०० या भागामध्ये करारनाम्यानुसार डांबरीकरणाचे काम सवलतदाराकडून करण्यात आले आहे. ज्यामध्ये कसारा घाटातील लांबीचा समावेश आहे. सवलतदाराने कसारा घाटातील खराब झालेल्या संरक्षण भिंती, गॅबियन भिंती, काँक्रीट ब्लॉक यांची दुरुस्ती केली आहे. याव्यतिरिक्त घाट परिसरामध्ये Thrie Beam, सूचनाफलक इत्यादी सुरक्षा विषयक उपाय योजना वेळोवेळी केल्या जातात. सद्यस्थितीत रस्ता सुस्थितीत आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

प्रस्तुत रस्त्याचे काम काम बांधा, वापरा, आणि हस्तांतरण (BOT) या तत्त्वावर करण्यात आले असून करारनाम्यानुसार महामार्गाच्या देखभाल व दुरुस्तीची कामे सवलतदाराकडून करण्यात येतात. त्यासाठी शासनामार्फत निधी देण्यात आलेला नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

कासिमपुरा, खंडू पाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील उस्मान शेठ इमारतीच्या शौचालयाच्या टाकीत पडून बालकाचा झालेला मृत्यु

(५१) * १९२८ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कासिमपुरा, खंडू पाडा (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील बि.नं. १०५६ उस्मान शेठ इमारतीच्या शौचालयाच्या टाकीत पडून कु. आहिद इजाज अन्सारी हा पाच वर्षाचा बालक मृत झाल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त इमारत महानगरपालिकेने दोन वर्षापुर्वी धोकादायक इमारत म्हणून घोषित करुन इमारतीचे काम बाह्य यंत्रणेमार्फत भिवंडी महानगरपालिकेकडून ठेकेदाराला देण्यात आले असून इमारत पाडण्याचे काम करत असताना तळमजल्यावरील शौचालयाची टाकी कंत्राटदाराकडून तशीच उघडी ठेवण्यात आल्याने कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे सदर अपघात घडला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त घटनेस पालिकेतील शहर विकास अनधिकृत बांधकाम प्रमुख, श्री.साकिब खरबे हे जबाबदार असून श्री.खरबे यांचे स्वत:चे घर महानगरपालिकेने ३ वेळा अनधिकृत म्हणून घोषित करुन तोडण्याचे आदेश देवूनही ते अद्यापपर्यंत तोडण्यात आले नसणे, त्याचप्रमाणे त्यांच्यावर बळीपाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे ३०७, ३४ अन्वये गुन्हा दाखल असून त्यांच्यावर अनेक प्रशासकीय चौकशा सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृत बालकाच्या कुटूंबाला २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यासह जबाबदार कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुद्ध मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. एकनाथ शिंदे : (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर धोकादायक इमारत महानगरपालिकेने बाहय यंत्रणेमार्फत तोडली नसून, महानगरपालिकेची परवानगी न घेता मालमत्ताधारक यांनी स्वत: सदरची इमारत अर्धवट पाडलेली आहे. सदर इमारतीच्या तळ मजल्यावरील शौचालयाची टाकी मालमत्ताधारक यांच्याकडून उघडी ठेवण्यात आली होती, ही वस्तुस्थिती आहे.

(३) अंशत: खरे आहे,

श्री. साकिब खरबे (तत्कालिन शहर विकास विभाग प्रमुख) हे राहत असलेले घर क्र.४८, बंदर मोहल्ला, बंदर रोड, भिवंडी ही मालमत्ता महानगरपालिकेकडील नोंदीनुसार डोंगरकर मस्जिद ट्रस्ट, भिवंडी यांचे नावे आहे. सदर ठिकाणी श्री.खरबे हे भाडेतत्वावर राहत आहेत. श्री.खरबे राहत असलेले घर अंदाजे २० ते २५ वर्षे जुनी इमारतीत असून महानगरपालिकेच्या अभिलेखावरून सदरची इमारत अनधिकृत घोषित केली नसल्याचे दिसून येत आहे.

महानगरपालिकेने सदर इमारत धोकादायक घोषित केली असून, ती मालमत्ताधारक यांनी महानगरपालिकेची परवानगी न घेता अर्धवट पाडल्याने व योग्य ती खबरदारी न घेतल्याने मालमत्ताधारक विरूध्द गुन्हा दाखल करण्याबाबत स्थानिक पोलीस स्थानकाला पत्र देण्यात आले आहे.

सदर प्रकरणी तत्कालिन शहर विकास प्रमुख यांना कारणे दाखवा नोटीस बजाविली असता, त्यांनी सादर केलला खुलासा समाधानकारक असल्याने, मान्य करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांचावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला नाही.

(४) अंशत: खरे आहे.

भोईवाडा पोलीस स्टेशन, भिवंडी येथे श्री.खरबे यांच्यावर कोणताही गुन्हा नोंद नसल्याचा अहवाल पोलीस विभागाकडून प्राप्त झालेला आहे.

तथापि, महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र.४ क्षेत्रातील मालमत्ता क्र.४४१ या धोकादायक इमारतीच्या पहिल्या मजल्याचा स्लॅब कोसळून दि.०३.०९.२०२३ रोजी झालेल्या दुर्घटनेत २ व्यक्तींचा मृत्यू झाल्या प्रकरणी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यासह श्री. खरबे यांच्या विरूध्द गुन्हा दाखल नाही, तथापि त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे.

सदर धोकादायक इमारत मालमत्ता धारकाने स्वत: निष्काळजीपणाने पाडली असल्यामुळे सदर दुर्घटना घडलेली आहे. अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये मृत व्यक्तींच्या कुटूंबाला महानगरपालिकामार्फत आर्थिक मदत देण्याची तरतुद नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

बुटीबोरी (जि.नागपूर) येथील उड्डाणपुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

(५२) * ५२४० श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुटीबोरी (जि.नागपूर) येथे साडेतीन वर्षापुर्वी बांधण्यात आलेला उड्डाणपुल हमी कालावधीपूर्वीच कोसळल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या उड्डाणपुलाचे सदोष बांधकाम करण्यात आल्यामुळे अवघ्या साडेतीन वर्षात पुल कोसळला असतांना सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारावर कारवाई न करता वाहन चालकावर जबाबदारी निश्चित केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उड्डाणपुलाची दुरुस्ती करणेसह दोषी कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले : (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग क्र.४४ वरील नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी उड्डाणपूलाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे.

रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या परवानगीच्या अटी शर्ती पालन न करता overloaded वाहन बुटीबोरी उड्डाणपूलावरून गेल्याने उडाणपूलाच्या डाव्या बाजूच्या Cantilever स्लॅब ला आधार देणाऱ्या P-२ व P-३ गाळयाचे struct Pockets अंशतः क्षतीग्रस्त झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) उड्डाणपूलाच्या नुकसान क्षतीग्रस्त भागावर उपाययोजना करण्यासाठी व क्षतीची कारणे तपासण्यासाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत VNIT नागपूर यांना तांत्रिक तपासणीसाठी नियुक्त केले आहे. कंत्राटदार M/S T&T Intra Built Pvt Ltd व प्रकल्प देखरेख सल्लागार M/S CEG Ltd यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. चौकशीअंती कंत्राटदार दोषी आढळल्यास करारातील अटी व शर्ती आणि भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या धोरणानुसार पुढील कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

धाराशिव नगरपालिकेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

(५३) * २२७७ श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपालिकेअंतर्गत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहाराप्रकरणी महाराष्ट्र शासनाने शासन पत्र क्र. वि.प.प्र. १७२३/११ प्र क्र-४२५/पोल १२, दिनांक ०७ जून, २०२४ नुसार SIT स्थापन करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक, धाराशिव यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलिस अधीक्षक, धाराशिव यांनी जा.क्र. वाचक एस. आय. टी. ३३११/२०२४, दिनांक ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी आदेश पारित केलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी विशेष तपास पथकामार्फत (SIT) ने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, त्यानुषंगाने दोषी अधिकारी/पदाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी विशेष तपास पथक (SIT) मार्फत सखोल चौकशी सुरु असून सदर गुन्ह्याच्या तपासात गुन्हा घडल्याच्या कालावधीमध्ये विशेष तपास पथकामार्फत नगरपरिषद, धाराशिव यांचे विशेष लेखापरिक्षण होणे गरजेचे असल्याने अपर पोलीस अधीक्षक, धाराशिव यांनी दि.२५.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, धाराशिव यांना नगरपरिषद धाराशिवचे विवादीत कालावधीचे विशेष लेखापरिक्षण होणेबाबत विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन : **जितेंद्र भोळे**

मुंबई. **सचिव (१) (कार्यभार),**

महाराष्ट्र विधानसभा

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.